# सहकार विशेषांक


ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख २१ एप्रिल, १९५४ | अंक १६



## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर



बँकेच्या खेड शाखेच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ दि. २३ जानेवारी रोजीं रजिस्ट्रार श्री. पी. जे. चिन्मुळगुंद ह्यांच्या हस्तें झाला.

१९०४ सालीं सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. त्याला आज पन्नास वर्षें होऊन गेलीं आहेत. ह्या अर्ध शतकांत सहकारी चळवळीनें केलेली सर्वांगीण प्रगति सुवर्णाक्षरांत लिहून ठेवण्यासारखी आहे. सर्व भरतखंड सहकारी चळवळीनें व्यापला असून दोनशें तीस कोटींचे वर भांडवल चळवळींत गुंतवलें गेलें आहे.

१९१७ सालीं लावलेल्या आपल्या छोट्या रोपाचें आतां विशाल वृक्षांत रूपांतर झालें आहे. सुरुवातीचें रुपये तीन लाखांचें खेळतें भांडवल आज एक कोटी साठ लाखांचे वर गेलें आहे. आपल्या बँकेची प्रगति सहकारी चळवळीचे बरोबरीनें झाली आहे. मुख्य कचेरीसह चार शाखांचे रौप्यमहोत्सव साजरे केले गेले आहेत.

सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय प्रथम आपल्या बँकेनेंच सुरू केली. त्याचे दर पूर्वीपेक्षां माफक केले आहेत. सर्व प्रकारचे बँकिंगचे व कर्जाचे व्यवहार मुख्य ऑफिसमधून व जिल्ह्यांतील १४ शाखांतून केले जातात.

भागाचें भांडवल नुकतेंच रु. १० लाख केलें असून भागविक्री सुरू आहे.

मो. वि. रवडे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल ...

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,१०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

**१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे,
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. जळगांव

मुख्य कचेरी : जळगांव

तारेचा पत्ता "EKCOBANK" टेलिफोन नं. ३५४

......प्रगतीचे बोलके आंकडे......

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भाग भांडवल | रु. १५,४३,४०० |
| राखीव व इतर गंगाजळी | रु. २०,५५,६०६ |
| ठेवी | रु. २,२७,९५,०३६ |
| सहकारी संस्थांकडील कर्जे | रु. ९८,५९,६१० |
| व्यक्तींकडील कर्जे | रु. १८,७१,५५० |
| रोख्यांत गुंतविलेली रक्कम | रु. ८१,२७,१०३ |

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

शाखा १३ : अंमळनेर, भुसावळ, बोदवड, चाळिसगांव, चोपडा, धरणगांव, एरंडोल, फैजपूर, जामनेर, पाचोरा, पारोळा, रावेर, यावल.

उपशाखा ११ : भडगांव, एदलाबाद, नशिराबाद, निंभोरा, मेहुणबारे, म्हसावद, कजगांव, सावदा, शेंदुर्णी, वरणगांव, व वरखेडी.

जळगांव हेड ऑफिसला व पारोळा शाखेस सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे.

डब्ल्यु. डी. साळुंखे, अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर — आर. वाय. सोनवणे, मॅनेजिंग डायरेक्टर



## दि बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—: स्थापना १९०६ :—

हेड ऑफिस : बार्शी शहर | शाखा : वैराग

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | १,१६,२४० |
| रिझर्व व इतर फंडस् | १,३४,२६१ |
| ठेवी | १४,२७,६५८ |
| खेळतें भांडवल | १७,९९,१३६ |

या बँकेमध्यें सर्व प्रकारचे चालू, सेव्हिंग व कायम ठेवी सवलतीचे दरानें स्वीकारल्या जातात.

तसेंच बिलकलेक्शन, हुंडी व चेक, मालतारण, सोनेंतारण व इतर कर्जव्यवहार केले जातात.

या बँकेची वैराग येथें शाखा असून तेथेंही वरीलप्रमाणेंच व्यवहाराच्या सोयी व सवलती ठेवलेल्या आहेत.

मा. वि. विश्वरूपे, वकील
चेअरमन.



## दि कराड अर्बन को. बँक लिमिटेड.

### कराड ( उत्तर सातारा )

स्थापना : १९१७ ] [ फोन नं. ४३

कऱ्हाड शहरांतील मध्यम व गरीब वर्गीयांची सतत २१ वर्षें 'अ' वर्गांत असलेली बँक

| | | |
|---|---|---|
| खेळतें भांडवल | ... | रु. ३०,८०,६०० |
| गंगाजळी | ... | रु. १,३३,११० |
| इतर निधी | ... | रु. २,०४,३८२ |
| ठेवी | ... | रु. २४,०१,३४५ |

**ठेवींचे दर ¾% ते ३¾%**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. २१ एप्रिल, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


# सहकारी सुवर्णमहोत्सवाचा शुभदिवस

## चळवळीचें राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंत रूपांतर

२६ मार्च, १९०४ रोजीं मुंबई राज्यांत सहकारी चळवळीस अधिकृतरीत्या प्रारंभ झाला. १९०४ च्या सहकारी कायद्याचा उद्देश सहकारी पतपेढ्यांची स्थापना करणें, त्यांवर देखरेख ठेवणें, त्याचप्रमाणें शेतकरी व लहान आर्थिक शक्तीचे कारागीर ह्यांचेमध्यें स्वावलंबनाच्या सहकाराचा प्रसार करणें, हा होता. गेल्या पन्नास वर्षांत सहकारी चळवळीचें व सहकारी धोरणाचें स्वरूप पार पालटलें आहे. सरकारी पुरस्कारानें सुरू झालेल्या चळवळीस बिगर-सरकारी कार्यकर्त्यांचा उत्साहकारक पाठिंबा मिळत गेला व सरकारी हस्तक्षेप कमी व्हावा अशी मागणी सुरू झाली. परंतु आतां, सहकार हें सरकारी धोरणाचें एक अविभाज्य घटक बनलें आहे. सामाजिक पुनर्रचना घडवून आणण्याचें व राष्ट्रीय उद्धाराचें तें एक साधनहि बनलें आहे. पतपेढ्यांच्या क्षेत्रापुरती चळवळ मर्यादित न रहातां, ती सर्वव्यापी बनली आहे. तथापि सामान्य जनतेच्या वृत्तीमध्यें मात्र सहकारी तत्त्वें पुरेशीं रुजलेलीं नाहींत आणि त्यामुळें सहकारी संस्था व त्यांचे सभासद ह्यांच्या केवळ संख्येवरून चळवळीच्या यशाचें मापन करणें बरोबर होणार नाहीं. सहकारी चळवळीचें दिखाऊ बाह्य स्वरूप कितीहि मोठें असलें, तरी आंतील दोषस्थळें विसरून कसें चालेल ? ज्यांच्या हितासाठी सहकाराचा अवलंब करावयाचा, त्यांच्यांतूनच सहकारी नेते व कार्यकर्ते निर्माण झाल्याविना सहकारी चळवळीस खरा जिवंतपणा प्राप्त होणार नाहीं. सहकाराचा प्रचार खालच्या थरापर्यंत पोंचला पाहिजे; कांहीं बड्या लोकांच्या वैयक्तिक जाहिरातीपुरताच तो मर्यादित असतां कामा नये. सुवर्णमहोत्सवाचा समारंभ ह्या उद्दिष्टास धरूनच सर्वत्र झाला व होत आहे, अशी आपण आशा बाळगूं या.

### लोकजागृतीची आवश्यकता

बचतीवाचून आपला तरणोपाय नाहीं ही गोष्ट आतां सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली आहे. भांडवलाची गरज भागविण्यासाठी आवश्यक असलेला पैसा लोकांच्या बचतीमधूनच उपलब्ध होणार हें उघड आहे. सहकारी प्रयत्नांसहि ही गोष्ट लागू आहे. स्वतःच्या भांडवलांतूनच प्रत्येक संस्थेस स्वतःची गरज कार्यक्षमतेनें भागवितां आली पाहिजे; बाहेरच्या मदतीवरील अवलंबन कमी होत गेलें पाहिजे. सहकारी चळवळीच्या स्फूर्तिदायक इतिहासाचें लोण वरपासून खालपर्यंत पोंचावें, ह्यासाठी लोकजागृतीची आवश्यकता आहे. सहकारी संघटनेच्या यशाकडे मोठ्या आशेनें आपण पहात आहों. ती आशा प्रत्यक्षांत उतरो, अशी प्रार्थना आहे.

### कृतज्ञता

सहकारी चळवळीच्या पुरस्कर्त्यांचें व कार्यकर्त्यांचें येथें कृतज्ञतापूर्वक स्मरण होणें स्वाभाविक आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत ज्या बिगर-सरकारी सद्गृहस्थांनीं ह्या चळवळीसाठी झीज सोसली, कष्ट केले, प्रोत्साहन दिलें, मार्गदर्शन केलें, त्या सर्वांच्या कार्याचें फळ आज आपणांस दिसत आहे. आतां सहकारी चळवळीस सरकारी स्वरूप प्राप्त झालें असलें तरी त्या चळवळीचा पाया ज्यांनीं घातला, अशांना शतशः धन्यवाद. सरकारी अधिकारी आपलें कर्तव्य तत्परतेनें बजावतात, तरी त्याला खासगी निरपेक्ष प्रयत्नांची ध्येयनिष्ठ बैठक सहसा येणार नाहीं. म्हणूनच निरपेक्ष खासगी प्रयत्नांची आठवण आजच्या परिस्थितींत ताजी करून देणें श्रेयस्कर होईल.

### सहकाराचें नवें स्वरूप

केवळ सद्भावनेनें प्रेरित होऊन कार्य करणाऱ्या निष्ठावंत बिगर-सरकारी सहकारी कार्यकर्त्यांना सहकारी चळवळीच्या सध्यांच्या स्वरूपांत हवें तें स्थान मिळत नाहीं, अशी त्यांची तक्रार आहे. आतांची सहकारी चळवळ आणि पूर्वीची सहकारी चळवळ ह्यांत फार फरक पडला आहे; ती आतां राष्ट्रीय अर्थव्यवस्था बनली आहे ह्या दृष्टीनेंच तिच्याकडे पाहिलें पाहिजे. प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं पुणें येथील सुवर्णमहोत्सवाच्या वेळच्या भाषणांत सक्तीच्या सहकाराचें नवें स्वरूप स्पष्ट करून सांगितलें. भांडवलशाही व गुंडगिरी दोन्हीं एकाच वृत्तीचे आविष्कार असून सहकारी अर्थव्यवस्था हाच त्यावर प्रभावी तोडगा आहे, असें सांगून ते म्हणाले:—

" चार सत्प्रवृत्त नागरिकांनीं एकत्र जमून, समाजसेवेचें एक माध्यम या दृष्टीनें सहकारी चळवळ करावयाची, हे दिवस आतां संपले असून ' चळवळीचें ' स्वरूप पालटून ' सहकारी अर्थव्यवस्थेची रचना ' करण्याचें काम आतां आपल्यापुढें आलेलें आहे. देशाच्या अर्थरचनेची प्रवृत्ति, व्यवस्था व नियोजन या सर्वांची धारणा सहकारी व्यवस्थेच्या पायावर उभारण्याशिवाय आतां गत्यंतर उरलेलें नाहीं. अन्यथा, सर्व-सत्ताधारी अल्पसंख्याक आणि भुकेलेले बहुसंख्याक यांचा भीषण संघर्ष अटळ ठरेल असें असल्यामुळें बिनसरकारी संमतीच्या जोडीलाच सरकारी सक्तीचा व सवलतीचा अंश मिसळून सहकारी अर्थव्यवस्थेचें नवें युग निर्माण करण्यासाठी ' पुढचें पाऊल ' टाकण्याचा हा क्षण आलेला आहे.

### दृष्टिकोनांतील फरक

" राजकीय व आर्थिक मागासलेपणा आणि व्यक्तिसाहसाला वाव देणारी अर्थव्यवस्था यांत लोकहित नांवाची कांहीं जाणीव असावी, याला स्थान नव्हतें. तेव्हां व्यक्तिहिताला मुरड घालून समाजहिताचा विचार करावा अशा सद्भावनेनें ह्या चळवळीचें कार्य सुरू झालें. पोटतिडिकेनें केलेलें हें चळवळीचें कार्य साधारण ' निष्काम कर्मयोगा ' प्रमाणें होतें. अशा लोकांनीं केलेलें

कार्य हें खूप मोठें असलें तरी समाजाच्या आजच्या गरजेच्या मानानें तें कमीच पडेल हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. आतां तर आपण ' सहकारी संघराज्य ' ही राष्ट्ररचनेची घोषणा केली आहे. घोषणा करतांना तिचा खोलवर विचार केलेला असतोच असें नाहीं. पण एकदां घोषणा समाजांत प्रचलित झाली म्हणजे त्या घोषणेचें वचन पाळण्यासाठीं तरी तिच्या अंगोपांगांचा विचार करावा लागतो. सहकारी संघराज्याच्या घोषणेचेंहि तसेंच झालें आहे. सहकारी संघराज्याची घोषणा केली खरी पण पहिल्या पंचवार्षिक योजनेंत तिचें प्रतिबिंब पडलें नाहीं. मधल्या अहवालांत त्याचा उल्लेख करण्यांत आला व आतां मी असें ऐकतों आहे कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या घोषणेच्या कार्यवाहीला प्राधान्य देण्यांत आलें आहे. म्हणजे, देशाच्या आर्थिक नियोजनाच्या गाभ्यांत सहकारी अर्थव्यवस्थेला स्थान मिळणार आहे. सहकारी चळवळींतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आपण हळूहळू सहकारी अर्थव्यवस्थेच्या तयारीला लागलों आहोंत. जुन्या व नव्या दृष्टीकोनांतील हा फरक फार महत्त्वाचा आहे.

### सहकार्याच्या जोडीला सक्ती

" पूर्वीच्या चळवळींत केवळ सहकार्याचा अंश होता. आतां त्याच्या जोडीला सक्तीचा अंश घ्यावा लागणार आहे. म्हणजे आतां बिनसरकारी प्रवृत्ति व सरकारी सक्ति यांचें सहकार्य होणार आहे. या नव्या कल्पनेचा एक अपरिहार्य परिणाम असा आहे कीं, केवळ पतपेढ्या किंवा बँका यांच्या पुरतेंच सहकारी व्यवस्थेचें स्वरूप मर्यादित रहाणार नसून अर्थ व्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांत त्याचा आविष्कार अटळ आहे. सहकारी चळवळीच्या आजपर्यंतच्या कार्याच्या दृष्टीनें सावकारीचा जाचक फांस सुटूं शकतो हें सिद्ध झालें आहे. पण याच्या-पुढील पायरी म्हणजे व्यापारी व्यवहारांत त्याचा आविष्कार करणें. याचाच अर्थ, अर्थव्यवस्थेची प्रवृत्ति आतां बदलली पाहिजे. आजपर्यंतची अर्थव्यवस्थेची प्रवृत्ति ही व्यक्ति-साहसा-वर आधारलेली व स्वार्थाला सवलत देणारी अशी बनलेली आहे. ही स्वार्थाची प्रवृत्तीच वरपासून खालपर्यंत आहे. खालीं आपण त्याला गुंडगिरी म्हणतों तर मोठ्या प्रमाणांत व मोठ्या क्षेत्रांत तिचा व्यवहार असेल तेथें तिला मांडवलशाही म्हणावयाचें एवढाच फार तर फरक होतो.

" दरिद्री देशांत तर अशा स्वार्थाधिष्ठित व्यक्तिसाहसाला वाव देणें म्हणजे समाजहिताकडे दुर्लक्ष करणेंच ठरत असल्यामुळें या जाचक प्रवृत्तींना सहकारी अर्थव्यवस्थेच्या चौकटींत बसविणें हें आपलें यापुढील सहकारी चळवळीचें ध्येय असलें पाहिजे. "

---

नेपाळमध्यें लोखंडाच्या खाणी—खाटमांडूपासून १० मैल अंतरावर गोदावरी डोंगरांच्या उतरणींत मोठ्या प्रमाणावर लोखंडाच्या खाणी सांपडल्याचें समजतें. ह्या भागाची भूगर्भीय पहाणी करण्यासाठीं नेपाळच्या सरकारनें मि. वॉकर नांवाच्या एका अमेरिकन खनिज तज्ज्ञाची नेमणूक केली आहे.

## ग्राहकांस सूचना

" अर्था 'च्या ह्यापुढील अंक दि. ५ मे रोजीं प्रसिद्ध होईल.

दि. २८ एप्रिलचा अंक सहकार विशेषांकानिमित्त बंद राहील.


## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

फोन नं. २१७) स्थापना : ८ मार्च १९१८ (पोस्ट बॉक्स नं. : ३२

मुख्य कचेरी : सोलापूर.

शाखा : (१) पंढरपूर, (२) करमाळा, (३) कुर्डुवाडी, (४) अक्कलकोट, (५) मंगळवेढा, (६) सिद्धार्थ शाखा, सोलापूर.

उपशाखा : (१) मोहोळ, (२) सांगोला, (३) मोडलिंब, (४) मैंदर्गी, (५) माढा.

दि. ३१-१२-१९५३ अखेरची त्रोटक माहिती.

सभासद : व्यक्ति भागीदार – २८८८, सोसायटी भागीदार – ५९२

| | |
|---|---|
| शेअर भांडवल ... ... | रु. ६,४३,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् ... | रु. ५,४९,००० |
| एकूण ठेवी ... ... | रु. ५०,७३,००० |
| खेळतें भांडवल ... ... | रु. ७०,१९,००० |

ही बँक सोलापूर जिल्ह्यांतील ( बार्शी व माळशिरस तालुका वगळून ) शेतकी व इतर सर्व प्रकारच्या सहकारी सोसायट्यांना कर्ज देण्याची व्यवस्था करते. हेड ऑफिस व शाखा-ऑफीसेसमधून बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. हेड ऑफीस येथें मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठीं लॉकर कॅबिनेटची व्यवस्था केलेली आहे.

चिं. सा. परांजपे, मॅनेजर. | गणपतराव धोंडिबा साठे, एम.एल.सी., चेअरमन.



स्थापना २८-६-३५ रजिस्टर नंबर ७३०४

## पूर्व खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., जळगांव

# शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय !

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळे होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

★ ★ ★

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ४९,१८३ |
| बँकेनें वांटलेलें कर्ज | रु. ९,००,२५० |

सी. जी. भिरूड, मॅनेजर. आर. बी. वाडेकर, चेअरमन.

## सहकारी स्टोअर्सच्या आद्य प्रवर्तकांचा स्फूर्तिदायक संदेश

सहकारी स्टोअर्सच्या मूळ कल्पनेतील बीज किती फलदायी आहे, ह्याची नीटशी कल्पना व प्रचीति आपल्या लोकांस नाहीं. सहकारी स्टोअर्सद्वारां चांगला व स्वस्त माल मिळूं शकतो, ही गोष्ट तर खरीच, परंतु तो हवा त्याप्रमाणें मिळविण्यासाठी स्टोअर्सचे संघ स्थापणें, आवश्यक त्या मालाचें मोठ्या प्रमाणावर पद्धतशीर उत्पादन करणें, इतकेंच नव्हे तर सभासदांच्या नैतिक व शैक्षणिक उन्नतीसाठी संस्था काढणें इत्यादि मार्गांनीं सहकारी संघटनेचें ध्येय व्यापक करून व तिची उपयुक्तता वाढवून समाजाला वळण लावण्याची शक्ति तिच्यांत आहे, ही गोष्टच आपल्या इकडे कोणास पटत नाहीं, अथवा शक्य वाटत नाहीं.

### पहिला खरा सहकारी स्टोअर

सहकारी स्टोअर्सच्या बीजाची पेरणी प्रथम इंग्लंडमध्यें झाली. तेथें स्टोअर्सच्या संघटनेनें आतां अत्यंत मोठ्या प्रमाणावर यश संपादन केलेलें आहे. इंग्लंडच्या अनुकरणानें युरोपांतील देशांतहि ही चळवळ पसरली व तेथेंहि तिला चांगलें यश प्राप्त झालें. इंग्लंडमधील मँचेस्टर शहराशेजारील रॉकडेल ह्या गांवांतील टोड लेन ह्या गल्लींत २१ डिसेंबर, १८४४ रोजीं पहिलें सहकारी दुकान स्थापन झालें. उपभोक्त्यांच्या सहकारी संघटनेचा त्या दिवशीं जन्म झाला, असें सर्वत्र मानलें जातें. त्या स्टोअरचें नांव " दि इक्विटेबल पायोनिअर्स ऑफ रॉकडेल." ह्या सोसायटीचे उत्पादक हे मुख्यतः कामकरी होते व त्यांनीं २८ पौंडांच्या भांडवलावर आपलें दुकान थाटलें. प्रारंभीं हा स्टोअर फक्त शनिवारीं व सोमवारीं उघडा राही व त्यांत फक्त मैदा, लोणी, साखर, इत्यादि जिन्नस मिळत. एक सभासद विक्रेता, दुसरा सेक्रेटरी, तिसरा कॅशिअर, चवथा निधिधारक व बाकीचे डायरेक्टर, प्रचारक व ग्राहक अशा रीतीनें त्या छोट्या दुकानाचा कारभार चालू झाला. रोखीनें खरेदी–विक्री व स्वच्छ, नितळ आणि चांगला माल ह्या गोष्टींकडे स्टोअरचा कटाक्ष होता.

### स्वावलंबन व परस्पर साहाय्य

अशा प्रकारचें काम करणारी ही पहिलीच संस्था मात्र नव्हती; " सहकाराचे महर्षी " असें कधीं कधीं संबोधण्यांत येत असलेल्या रॉबर्ट ओवेनच्या शिकवणीस अनुसरून रॉकडेल सोसायटीच्या पूर्वी कित्येक सोसायट्या स्थापन झालेल्या होत्या. तथापि त्यांचें स्वरूप धर्मादाय होतें; कमी मजुरी मिळणाऱ्या कामगारांचे हाल वांचविण्याच्या हेतूनें दयाबुद्धीनें काढलेल्या त्या सोसायट्या होत्या. सहाजिकच, त्यांच्या भांडवलदार उत्पादकांनीं भांडवल पुरविलें तरी त्यांनीं स्वतः ह्या दुकानांत फारशी खरेदी केली नाहीं, स्वस्ताईव्यतिरिक्त दुसरा उद्देश नजरेपुढें ठेवला नाहीं व नफ्याची दृष्टि राखली नाहीं. नफा झालाच, तर तो भागीदारांत वांटून टाकण्यांत आला किंवा रिझर्व्ह फंडांत अडकविण्यांत आला. पुढें, नफ्याची वांटणी सर्व सभासदांत समप्रमाणांत करण्यांत येऊं लागली, त्या कारणानें उत्साही सभासद व स्टोअरचें दर्शनहि न घेणारे सभासद हे एकाच पातळीवर आले. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम अपेक्षेप्रमाणेंच झाला. रॉकडेल पायोनियर्सचा पाया स्वावलंबन व परस्पर साहाय्य, हा असल्याकारणानें त्यांची संस्था मात्र प्रारंभींच्या कांहीं अडचणींतून पार पडून, भरभराटीस आली व अजरामर झाली.

### नफा वांटणीचें लोकशाही तत्त्व

रॉकडेल पायोनियर्सनीं स्टोअरच्या नफ्याच्या वांटणीचें जें तत्त्व योजिलें तेंच अखेर प्रभावी ठरलें आहे. भागीदाराच्या भागांच्या प्रमाणांत किंवा सर्वांस सारखा नफा न वांटतां, प्रत्येकाच्या खरेदीच्या प्रमाणांत तो वाटण्याचें रॉकडेल पायोनिअर्सनीं ठरविलें. नफा वांटणीची ही पद्धत तात्काळ लोकप्रिय झाली. ह्यापूर्वीच्या कांहीं स्टोअर्सनीं ह्या पद्धतीचा प्रयोग केला असला, तरी यशाचें श्रेय रॉकडेल पायोनिअर्सना मिळालें व तेंच ह्या चळवळीचे आद्य पुरस्कर्ते ठरले. सामान्य गिऱ्हाईक म्हणजे सर्वसाधारण समाज ह्यास स्टोअरच्या यशांत व उत्कर्षांत वांटा प्राप्त झाला व स्टोअर्सच्या चळवळीस लोकशाही स्वरूप प्राप्त झालें. खरेदी व विक्री यांतील तफावत गिऱ्हाईकांस बोनसच्या स्वरूपांत मिळूं लागली. कायद्याप्रमाणें रॉकडेल पायोनिअर्सना फक्त आपल्या सभासदांसच माल विकतां येई. ह्या कारणानें सभासदांची संख्या वाढविणें त्यांस जरूर झालें व त्यांस भांडवलाचीहि आवश्यकता होतीच. पुढें १९५२ च्या एका कायद्यानें वरील बंधन दूर केलें, फक्त १ शिलिंग म्हणजे १२ आणे प्रवेश फी देणारास स्टोअरचें सभासदत्व प्राप्त झाल्या कारणानें सभासदांची संख्या वाढणें सोपें झालें. जितके सभासद जास्त त्या मानानें त्यांची एकूण खरेदीहि अधिक आणि त्याबरोबर स्टोअरची उलाढालहि जास्त. त्यामुळें वाढत्या व्यवहाराचा फायदा सर्वांसच मिळतो. कायम स्वरूपाचे खर्च व पगार खर्च उलाढालीचे प्रमाणांत वाढत नाहींत व थाऊक मोठी खरेदी उलट जास्त किफायतशीर होते. सहाजिकच बोनसचा दर भागीदारांची संख्या वाढली तर अधिकाधिकच होत जातो. अशा रीतीनें खरेदीच्या प्रमाणांत बोनस देण्याच्या योजनेमुळें स्टोअरच्या भागीदारांस मोठ्या उलाढालीच्या अनुषंगानें येणाऱ्या फायद्यांत भागीदारी प्राप्त होते; परंतु ती खरेदीदार या नात्यानें व खरेदीच्या प्रमाणांतच कांहीं थोड्या भांडवलदारांच्याच घशांत नफा जात नाहीं. त्यामुळें स्टोअरच्या भागीदारांची संख्या वाढण्यांत सर्वांचेंच हित असतें. स्टोअरच्या भरभराटीबरोबर त्याची पतहि वाढते व त्याला कमी दरानें भांडवल मिळूं शकतें. व्याजांत होणारी ही बचत भागीदारांतच अप्रत्यक्ष रीतीनें वाटली जाते. प्रत्येक सभासदास एकच मत ठेवून व तें त्यानें प्रत्यक्ष सभेस उपस्थित राहून दिलें पाहिजे, असा नियम करून रॉकडेल पायोनिअर्सनीं स्टोअर्सच्या नफावांटणीप्रमाणें कारभारांतहि लोकशाही स्थापन केली आणि उपभोक्त्यांच्या सहकारी संघट-

---

## चळवळीचें लोण खोलवर पोंचलें पाहिजे

हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचा सुवर्णमहोत्सव होत आहे. त्यांत सहभागी होण्यास मला आनंद वाटतो. खेड्यापाड्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यास या सहकारी चळवळीचा गेल्या अर्धशतकांत फारच उपयोग झाला आहे. को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांनीं व संस्थांनीं केलेल्या कामगिरीबद्दल त्या अभिनंदनास पात्र आहेत. आपला देश गरीब आणि लोकसंख्या अमाप, यामुळें आपली आर्थिक दुरवस्था ही नड कायमचीच बाब होऊन बसली आहे. यामुळें अशा सहकारी संस्थांचा उपयोग फारच आहे. भारत हा मुख्यत्वें कृषिप्रधान देश आहे. अर्थात् लोकांना शिक्षित करण्याचें आणि त्यांना स्वावलंबी बनविण्याचें सहकारी चळवळ हें एक उत्कृष्ट साधन होय. या चळवळीचें लोण खेड्यापाड्यापर्यंत खोल जाईल, तेव्हांच आपल्या राष्ट्राची आर्थिक स्थिति सुधारेल.

— डॉ. राजेंद्रप्रसाद

नेचा मजबूत पाया घातला. सहकारी स्टोअर्सची पुढें फेडरेशन्स निर्माण झालीं व उत्पादनक्षेत्रहि त्यांनीं व्यापून आपलें जाळें व्यापक केलें.

### सहकारी स्टोअर्सचें ब्रिटिश जीवनांत स्थान

ग्रेट ब्रिटनमध्यें रॉकडेल पायोनिअर्सच्या तत्त्वावर आज २० हजार स्टोअर्स चालू आहेत व त्यांच्या सभासदांची संख्या ९० लक्ष आहे. एकूण ब्रिटिश लोकसंख्येच्या एक तृतियांशाइतकी संख्या सहकारी कुटुंबियांची असून सहकारी स्टोअर्समध्यें दरवर्षी ६०० कोटि रुपयांची उलाढाल होते. मालाचें उत्पादन, बँकिंग, विमा, इतकेंच नव्हे तर शिक्षण, करमणूक, इत्यादि क्षेत्रांतील व्यवहारहि सहकारी कक्षेंत आणून ब्रिटिश सहकारी चळवळीनें भांडवलशाहीस तोंड देण्यास क्षम अशी संघटना तयार केली आहे. ह्या संघटनेचें आर्थिक बळ ही ब्रिटिश आर्थिक जीवनांतील एक प्रभावी बाब झाली आहे आणि संघटनेच्या मतास महत्त्व प्राप्त होऊन व्यापक अशा सामाजिक क्षेत्रांतहि तिला विशिष्ट स्थान प्राप्त मिळालें आहे. रॉकडेलच्या २८ कामकऱ्यांनीं आपल्या स्फूर्तीनें त्यावेळीं ठरविलेली कामाची दिशा तात्कालिक ठरलेली नसून ११० वर्षांनंतरहि युद्धोत्तर पुनर्घटनेच्या कामीं आतां तिच्या मार्गदर्शनाचें महत्त्व पुनः एकवार सिद्ध झालें आहे. केवळ ध्येय ठरवून हे २८ कामकरी थांबले नाहींत. ध्येयाच्या प्राप्तीचा व्यावहारिक मार्गहि त्यांनीं प्रत्यक्ष कृतीनें दाखवून दिला. ११० वर्षांच्या अनुभवानंतरहि रॉकडेलच्या अशिक्षित कामकऱ्यांचें ध्येय व त्याच्या प्राप्तीचीं साधनें हीं अबाधित राहिलीं आहेत, ही गोष्ट असामान्य अशीच समजली पाहिजे. कामकरी लोकांचा आर्थिक उद्धार घडवून आणून, त्यांचेमध्यें व्यवहारी व लोकशाही वृत्ति निर्माण करण्याचें काम रॉकडेल स्टोअर्सच्या नमुन्याप्रमाणें निघालेल्या स्टोअर्सनीं युरोपांतील बहुतेक देशांत केलें आहे. स्टोअर्सच्या द्वारां लोकांना संघटित प्रयत्नाचें महत्त्व कळून त्यांचेमध्यें आत्मविश्वास निर्माण होतो व नागरिक ह्या नात्यानें राष्ट्रहिताकडे बघण्याची दृष्टि त्यांस प्राप्त होते अशा प्रकारची कामगिरी करणाऱ्या प्रचंड शक्तीचें बीज पेरण्याचें श्रेय रॉकडेलच्या मूळ सहकारी कामकऱ्यांच्या स्टोअरचेंच आहे.

### हिंदी वृत्ति पोषक नाहीं काय ?

ब्रिटिश सहकारी स्टोअर्सचा हा स्फूर्तिदायक इतिहास हिंदुस्थानांतील जनतेस मार्गदर्शक होण्याजोगा आहे. रेशनपुरताच माल आपल्या स्टोअरमधून घेऊन, शक्यतों उधारीचा अवलंब करून व स्टोअरच्या व्यापक ध्येयाकडे तुच्छतेनें पाहून आपल्या स्वार्थापुरता त्याचा फायदा करून घेणाऱ्या आपल्या बांधवांस गरीब, अशिक्षित परंतु निष्ठावंत अशा रॉकडेलच्या कामकऱ्यांपासून पुष्कळ शिकतां येण्याजोगें आहे. अगदीं जरूरीच्या वस्तूंच्या विक्रीच्या सोयीपासून प्रारंभ करून सहकाराचें लोण आवश्यक त्या मालाच्या उत्पादनापर्यंत पोंचविण्याचें ध्येय दृष्टीसमोर ठेवणाऱ्या व त्यासाठीं अविरत परिश्रम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अभावीं जर सहकारी स्टोअर्स, अल्पायुषी न ठरले, तरच आश्चर्य. हिंदी स्टोअर्सचा इतिहास फारसा उत्तेजनकारक नाहीं. जी गोष्ट रॉकडेलच्या अशिक्षित कामकऱ्यांस १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत शक्य झाली, तीच गोष्ट हिंदुस्थानांत ११० वर्षांनींहि कां साध्य होऊं नये ? हिंदी लोकांची वृत्ति स्टोअरच्या कल्पनेस पोषक नाहीं काय? त्यांचेमध्यें सहकारी वृत्तीचा अभाव असेल तर एकतरी राष्ट्रीय किंवा समाजहिताची चळवळ यशस्वी होऊं शकेल काय? "इंग्लंडची गोष्ट वेगळी" "सरकारी अधिकाऱ्यांत सहानुभूतीचा अभाव" इत्यादि सबबी किती दिवस चालणार ? उच्च ध्येय, त्यासाठीं स्वार्थत्याग, परस्पर साहाय, अंतिम यशावर विश्वास, इत्यादींच्या विकासाची गरज सर्वच क्षेत्रांत आपणांस तीव्रतेनें भासत आहे.

### चैतन्य व स्फूर्ति आवश्यक

अनास्था, अत्यंत संकुचित स्वार्थ, दूर दृष्टीचा अभाव, ही नाहींशीं झाल्याविना सहकारी स्टोअर्सचीच काय परंतु लहान मोठी कोणतीच संघटित चळवळ यशस्वी होणार नाहीं. अपेशी मनोभूमिका बदलून तिच्यांत चैतन्य निर्माण करण्याची स्फूर्ति रॉकडेलच्या कामकऱ्यांचे उदाहरणानें मिळूं शकेल. इतर दुकानांपेक्षा स्वस्त माल मिळतो, एवढ्याचसाठीं स्टोअरबद्दल जिव्हाळा वाटणाऱ्या व एकादे प्रसंगीं बाजारभावापेक्षा सकारण ज्यास्त किंमत पडली तरी भडकून जाणाऱ्या लोकांचे हातून स्टोअर्सच्या संघटनेस कांहींहि साहाय होणार नाहीं. स्टोअरच्या मूळ तत्त्वांची शिकवण त्यांचेमध्यें भिनल्याविना प्रगति होणें अशक्य आहे.

**इजिप्तच्या प्रदर्शनांत किर्लोस्करांचा माल**—इजिप्तमध्यें भारतीय व्यापार व कारखानदारीचें एक प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनांत किर्लोस्कर कारखान्याचा माल ठेवण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस् कंपनीनेंहि आपला कांहीं डबाबंद माल ठेवला आहे.

**त्र्यंबकेश्वरावर विजेचा लखलखाट**—नाशिकजवळील त्र्यंबकेश्वराचें स्थान हें भारतामधील १२ ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. ह्या देवळावर विजेचे दिवे लावण्यासाठीं शेठ जयरामभाई ह्याभाई ह्या दानशूर गृहस्थांनीं वीज निर्माण करण्याची यंत्रसामुग्री देणगी म्हणून दिली आहे. वीज निर्माण करण्यासाठीं ऑइल एंजिनचा उपयोग करण्यांत येत आहे.

महाराष्ट्रांतील नागरी सहकारी चळवळीमध्यें कित्येक वर्षें लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र असलेली एकमेव नागरी सहकारी संस्था

## दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर ( जि. सोलापूर )

स्थापना सन १९११ [ रुपये ]

| | | |
|---|---|---|
| ( १ ) शेअर भांडवल | ... | ५८,५६० |
| ( २ ) रिझर्व्ह फंड | ... | ४१,६६० |
| ( ३ ) इतर फंडस | ... | ४५,८५१ |
| ( ४ ) ठेवी | ... | ७,७४,९५० |
| ( ५ ) सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम | ... | ४,००,९८५ |
| ( ६ ) खेळतें भांडवल | ... | ९,११,०११ |

या बँकेंत मुदतीच्या ठेवी, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक्स, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां ऑफिसकडे लिहा.

पं. रा. कुलकर्णी
मॅनेजर

पां. द. आराध्ये
चेअरमन

## सहकारी चळवळीस महाराष्ट्रांतील आर्थिक लोकशाही अनुकूल

**( वैकुंठराय मेहता )**

आर्थिक दृष्ट्या महाराष्ट्र गरीब समजला जातो, पण देशांतील इतर प्रांतांपेक्षा गरिबी सर्वत्र सारखी विभागली गेली आहे हेंच महाराष्ट्राचें वैशिष्ट्य म्हणावें लागेल. त्यामुळेंच सहकारी चळवळीच्या प्रतिनिधीभूत अशा आर्थिक लोकशाहीचें मूळ महाराष्ट्रांतच धरूं शकेल असें मला वाटतें. कारण येथील शहरांतील वा खेड्यांतील जनता पाहतां त्यांत इतरत्र दिसणारी गरीब-श्रीमंतीची परस्परांपासून दूर अशीं दोन टोकें दिसत नाहींत.

सहकारी चळवळीच्या कार्यांत मला कै. गोपाल कृष्ण देवधर यांच्याकडून प्रेरणा मिळाली व महाराष्ट्रांतच पुणें जिल्ह्यांतील बारामती येथें सहकारी चळवळीच्या शिक्षणाचे पहिले धडे मला मिळाले हें सांगण्यास मला अभिमान वाटतो. आजहि या क्षेत्रांतील माझे अनेक स्नेही व सहकारी महाराष्ट्रांतीलच असून त्यांना या महोत्सवाच्या निमित्तानें मी शुभेच्छा व्यक्त करतों.

सबंध प्रांताकरितां कार्य करणारा एखादा रायफेसन येथें नसेल परंतु आपापल्या क्षेत्रांत ज्या स्वार्थत्याग बुद्धीनें व तनमनानें कांहीं कार्यकर्ते सेवाव्रत चालवीत आहेत, तें पाहिलें म्हणजे ते त्या त्या क्षेत्राचे रायफेसन होत असें म्हणावें लागेल.

## सहकारच तारील

**( दा. वि. गोखले )**

सहकारी चळवळीचा अनुभव कितीहि बरावाईट असला व त्याचा अर्थ कितीहि कडू-गोड वाटला तरी एक गोष्ट निःसंशय आहे कीं, भारतांतील गरीब, असहाय व अज्ञानी शेतकऱ्याला सहकारी अर्थव्यवस्थाच कल्याणप्रद होणारी आहे, म्हणून सहकारी चळवळीचीच कास धरली पाहिजे यांत शंका नाहीं. चुका सुधारल्या जातील, निराशेची जागा आशा घेईल व अज्ञान नाहींसें होऊन ज्ञान प्रभावी ठरेल. कार्य डोंगराएवढें आहे व हें उचलण्यास सर्वांनीं तयार झालें पाहिजे. शेतकऱ्यांचा जर उद्धार व्हावयाचा असेल त्यांनींहि आपल्या शीलाचा कायाकल्प केला पाहिजे. ही चळवळच अशी आहे कीं तिला असत्याचें, अनीतीचें व अप्रामाणिकपणाचें वावडें आहे. युरोपांत ही चळवळ शेतकरी क्षेत्रांत कामधेनु ठरली. याचें कारण तेथील लोकांच्या नैतिक जीवनाची उच्च पातळी हेंच होय. आपल्या देशांत मात्र या कामधेनूचें दूध काढावयास बसलें तर दुधाऐवजीं लाथा खाव्या लागतात. याचें कारण आपला मागासलेपणा व नीतिभ्रष्टता होय. तथापि आतां हा अंधार कमी होत असून आशेचे किरण दिसूं लागले आहेत. सहकार हीच जीवननिष्ठा वाटणाऱ्या कार्यकर्त्यांची व अधिकाऱ्यांची संख्या वाढत आहे. अखिल भारतीय शेतकी कमिशननें सारांशरूपानें स्पष्ट बजावलें होतें कीं "सहकारी जीवन जगण्यांतच शेतकऱ्यांची उन्नति आहे. हा प्रयत्न जर फसला तर मात्र निराशाच पदरीं येईल." या सुवर्णमहोत्सवाच्या प्रसंगाचा फायदा घेऊन अंतःपरीक्षण केलें व पुढच्या प्रगतीच्या केंद्राकडे लक्ष देऊन सर्वांगीण सुधारणा केल्या तर सहकारी तत्त्वज्ञान आपल्या शेतकऱ्याला खास तारील असा भरंवसा वाटतो.

## सहकारी संस्था आणि विकासयोजना

**( वा. पुं. वर्दे )**

सहकारी बँकांमुळेंच मुंबई राज्यांतील बँकिंगचा आज झालेला प्रचंड विकास दिसून येत आहे असें म्हणणें अवास्तव ठरणार नाहीं. कर्जावरील माफक दर, पैसे एका गांवाहून दुसऱ्या गांवीं पाठविण्याबद्दलचे कमिशनचे दर, आणि बिनत्रासदायक अटींवर प्रतीप्रमाणें कर्जाऊ रक्कम देण्याची सोय या सर्व बाबी बँकिंगच्या क्षेत्रांत सहकारी बँकांच्या यशस्वी व्यवहारामुळेंच शक्य झाल्या आहेत. तसेंच बँकांचा एकूण कारभार माफक खर्चांत व किफायतशीररीत्या साधारण नागरिकवर्गाहि करूं शकतो हेंहि सहकारी बँकांनीं दाखवून दिलें आहे.

यापुढें ग्रामीण भागांत बचत-योजना यशस्वी करण्यासाठीं किंवा पतीवर व्यवहार करण्याकरितां सहकारी बँकांना फार मोठें क्षेत्र मोकळें असून त्यांना सर्वसाधारण नागरिकास बँकांच्या व्यवहाराच्या सर्व सोयी उपलब्ध करून मोठें उपयुक्त कार्य करतां येईल. त्या दृष्टीनें त्यांना उज्ज्वल भवितव्य आहे. भारताच्या पंचवार्षिक योजनेंतील विकास-योजनांच्या कामासाठीं त्यांचा बहुविध उपयोग होणारा असून सरकारनें सहकारी बँकांना अधिक उत्तेजन दिलें तर त्या ग्रामीण भागांतील आर्थिक व्यवहार पार पाडण्यासाठीं सुयोग्य अशी यंत्रणा निर्माण करूं शकतील यांत कांहींच संशय नाहीं.

## सहकारी संस्थांची देखरेख व तपासणी सरकारी अधिकाऱ्यानें करावी

**( द. दि. चितळे )**

पूर्वीचें परकीय सरकार व स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेलें स्वकीय सरकार यांत पुष्कळ फरक आहे. हल्लींचें सरकार लोकमत धुडकावणार नाहीं अशी परिस्थिति असल्यानें अशा सरकारच्या नोकरास लोकमत लक्षांत घेऊनच आपलें काम करावें लागेल. सबब देखरेख करण्याचें काम सरकारी नोकरांवर सोपविल्यास तो अनिर्बंधपणें सुलतानशाही गाजवील अशी भीति बाळगण्याचें आतां कारण राहिलेलें नाहीं. तसेंच आतां आपलें सरकार सर्वस्वीं लोकमतानुवर्ती झालें असल्यानें यापुढें तालुका सुपरवायझिंग युनियन्स व त्यांचें जिल्हा बोर्ड यांची फारशी आवश्यकता राहिली आहे असेंहि आम्हांस वाटत नाहीं. हल्लींची सुपरवायझिंग युनियन्स व त्यांचें जिल्हा-बोर्ड शोभेसाठीं असावें असें वाटत असल्यास त्यास आमचा विरोध नाहीं; मात्र त्यांच्याकडे दैनंदिन कारभाराची कसलीहि जबाबदारी न ठेवतां सदर युनियन्स व बोर्ड केवळ सल्लागार स्वरूपाची राहून वर्षांतून फार तर दोन वेळां तालुक्यांतील व जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा फक्त आढावा घेण्यासाठीं बोलावलीं जातील अशी त्यांच्या घटनेंत दुरुस्ती करावी; असें केल्यानें खर्चांत बरीच बचत होऊन सोसायट्यांवरील देखरेख एकहातींच राहील.

सुपरवायझर यांच्या कामांत कांहीं चुकारपणा दिसून झाल्यास त्याबद्दल सहकारी खात्यास त्यांना जाब विचारतां येईल व सुपरवायझर यांनाहि त्याबाबत समाधानकारक असा खुलासा देणें भाग पडेल. दुसरें असें कीं, सुपरवायझर एकाच ठिकाणीं अनेक वर्षें काम करीत असल्याचें सध्यां दिसून येतें. सरकारी नोकर एकाच ठिकाणीं फार वर्षें राहिल्यास त्याची तेथील लोकांत बरी-वाईट नातीं निर्माण होतात व त्यामुळें त्याच्या कामांत वैगुण्य उत्पन्न होतें. असें होऊं नये म्हणून कोणाहि सुपरवायझरास एका ठिकाणीं तीन वर्षांपेक्षा जास्त काळ ठेवूं नये. तसेंच त्यास त्या जागीं पुन्हा नेमूं नये, अशी सूचनाहि करणें शेवटीं आवश्यक वाटतें.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपिन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.


एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :


ब्रँच सेक्रेटरी.



## किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे





वसंत नं. ३ चरक

" शरद चरक "

**उसाचे चरक**

**हंगाम नजीक आला !**

—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—

**किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी,** (जि. द. सातारा)



## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर

र. नं. ६४६४ ] [ स्थापना-६ जून १९२९

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल ... | ४२,९१० |
| रिझर्व्ह फंड ... ... | २०,३०१ |
| इतर फंडस् ... ... | १४,६७७ |
| ठेवी ... ... | २,५३,२१४ |
| एकूण खेळतें भांडवल... ... | ३,४४,७८६ |

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

१ श्री. अ. धों. कुळकर्णी,
बी. ए., बी. टी., प्रेसिडेंट

२ श्री. ना. सि. बाचा — ऑ. मॅ. डायरेक्टर
३ ,, द. वि. पारसवार — व्यापारी
४ ,, ए. रा. देशमुख, — जमीनदार
५ ,, कृ. ना. पंडीत, — बी. ए., एलएल. बी.
६ श्री. भ. मा. माळकीकर, — वकील
७ ,, शं. गं. बंदगूळ, — व्यापारी
८ ,, सा. ह. साळुंके, — व्यापारी
९ ,, कृ. गो. जानकर, — व्यापारी

बँक आपल्या सभासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेवं, सोने–चांदी व उदीम माल वगैरेंच्या तारणावर कर्जे देतें.

तसेंच सभासदांस व इतरांनाही नियमितपणा, काटकसर व शिल्लक ठेवणेची संवय लावावी या हेतूनें बँकेनें क्ष्मेबंदी ठेवींचें खातेंही बऱ्याच वर्षांपासून सुरू केलें असून, सदरहू खात्यावर द. सा. द. शें. ४ टक्के व्याजाचा दर ठेवीदारांना मिळाला जातो; तरी सदरहू बचत योजनेचा फायदा सभासदांनीं व इतरांनीं घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. तत्संबंधींचे नियमासंबंधी व कायम ठेवींचे व्याजाचे दरासंबंधी ऑफिसमध्यें चौकशी करावी.

**ना. धों. डंके** — मॅनेजर
**ना. सि. बाचा** — ऑ. मॅ. डायरेक्टर
**अ. धों. कुळकर्णी** — प्रेसिडेंट



पो. बॉ. नं. ११ श्री टे. नं. ५५

## कल्याण पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., कल्याण ( ठाणें )

[ स्थापना : ४—६—१९२३ ]

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रु. | ५,००,००० |
| भरलेलें भांडवल ... ... रु. | ३,१३,३४० |
| खेळतें भांडवल ... ... रु. | २८,३४,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् ... ... रु. | ३,००,००० |

**श्री. दौलतराव जयरामराव झुंझारराव** ( चेअरमन )

[ आमची बचत योजना ]

दरमहा थोडथोडी बचत करून पैसे सांठवूं इच्छिणाऱ्यांचे सोईसाठीं बँकेच्या संचालक मंडळांनीं बचतयोजना हातीं घेतली आहे, व ती दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे. आमच्या बचत योजनेचें वैशिष्ट्य म्हणजे बचत केलेल्या रकमेवर ३॥ टक्के दरानें व्याज मिळतें. ठराविक तारखेस नियमित रक्कम ४५ महिने भरलेली पांच वर्षांनंतर सव्याज परत मिळते. या योजनेचें कोष्टक खालीं दिलें आहे.

| दरमहा भरावयाची रक्कम | एकूण भरावयाची रक्कम | मिळणारी रक्कम | दरमहा भरावयाची रक्कम | एकूण भरावयाची रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४५ | ५० | १० | ४५० | ५०० |
| ५ | २२५ | २५० | १०० | ४५०० | ५००० |

स्पेशल सेव्हिंग डिपॉझिटवर ३ टक्के दराचें व्याज दिलें जातें. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस : **टिळक चौक, कल्याण**

—शाखा कचेऱ्या—

**(१) शिवाजी चौक, कल्याण (२) डोंबिवली, जि. ठाणें (३) शहापूर, जि. ठाणें (४) अंबरनाथ, जि. ठाणें**

अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा.

**बाळकृष्ण बाबुराव रुद्रमटे** — मॅनेजर
**गंगाधर वासुदेव भिडे**
**मूळशंकर कृष्णराम जोशी** — मॅनेजिंग डारेक्टर्स

## कार्याच्या तोडीचें नेतृत्व लाभो !

**( वि. द्वा. देशमुख )**

आपल्या देशांत जनहितास प्राधान्य देणारी कल्याणकारी अर्थ-व्यवस्था निर्माण करण्याचा आपण प्रयत्न करीत आहों आणि त्या-दृष्टीनें पंचवार्षिक योजनेच्या कांहीं उद्दिष्टांच्या साध्यासाठीं सहकारी चळवळीची शिफारस करण्यांत आलेली आहे. सहकारी संघटनेचा पुरस्कार करून तिला प्रोत्साहन देणें, हा राष्ट्रीय धोरणाचा एक प्रमुख उद्देश आहे व राहील. बिन-सरकारी कार्यकर्त्यांच्या निष्ठावंत सेवेविना सहकारी चळवळीची मुंबई राज्यांत एवढी प्रगति झालीच नसती; म्हणून चळवळीच्या सभासदांचें अभिनंदन करतांना ह्या आस्थेवाईक कार्यकर्त्यांचा मी मुद्दाम उल्लेख करतों. त्यांनीं सुवर्णमहोत्सवाच्या निमित्तानें चळवळीच्या भूतपूर्व यशाचा व पुढील लक्ष्यांचा आढावा घ्यावा, अशी माझी सूचना आहे. सहकारी संघटनेचे सामाजिक फायदे अगदीं स्पष्ट आहेत; परंतु आर्थिक कार्यक्षमतेच्या दृष्टयाहि इतर संघटनांशी तिची तुलना होऊं शकेल ह्याची आपण दक्षता बाळगली पाहिजे. ह्यापुढील कार्याचे प्रचंड डोंगर व मिळणारी संधि ह्यांच्या प्रचंड स्वरूपास पुरें पडेल एवढें सरकारी व बिगर-सरकारी नेतृत्व चळवळीस लाभावें, अशी माझी आशा व अपेक्षा आहे.

---

## नव्या आर्थिक-सामाजिक घडीची गुरुकिल्ली

( डब्ल्यू. पी. वॉटकिन्स, डायरेक्टर, इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स, लंडन )

भारतांतील सहकारी चळवळ ही इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्सपैकीं वयानें जरा तरुणच चळवळ असली तरी ती आकारानें बरीच मोठी आहे. परंतु भारताच्या प्रचंड लोकसंख्ये-च्या मानानें तिचा विस्तार मोठा म्हणतां येणार नाहीं. म्हणूनच ती आणखी पुष्कळच वाढेल, असा विश्वास वाटतो. अर्थात्, ह्या चळवळीचें स्वरूप आणि विधायक प्रगतीची तिची शक्ति ह्याचें सभासदांना, त्याचप्रमाणें भारताच्या उद्धाराची व हिताची जबाब-दारी वहाणाऱ्यांना पूर्णपणें आकलन झालें पाहिजे. ही जबाबदारी आतां आणि ह्यापुढेंहि दीर्घकालपर्यंत मध्यवर्ती आणि राज्य सरकारांवरच पडणार, हें उघड आहे. सहकाराच्या कार्याचें संपूर्ण फळ हातीं पडावयाचें असेल, तर लोकांनीं स्वतःच्या रहाणीचें मान वाढविण्याचे कामीं अधिक नेटानें प्रयत्न केले पाहिजेत; सरकारच्या पुरस्काराची वाट पहातां कामा नये. शेतकरी, काम-करी, गृहिणी, ह्या सर्वांनींच झटलें पाहिजे. दारिद्र्य नष्ट करण्याचें साधन, सहकारी चळवळ, त्यांच्या हातीं देते व त्याच्या वापराचें शिक्षणहि देते. व्यक्तिस्वार्थ व व्यक्तिस्वातंत्र्य ह्यांच्या पकडी-पासून हिंदी माणसाचें मन अलिप्त आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. मुंबई राज्यांतील सहकारी उपक्रमांत उत्साह आणि विविधता दिसून येते; ह्यांपैकीं कित्येक उपक्रमांस सहकारी इन्स्टिट्यूटनें चालना दिलेली आहे. लोकांमध्यें सहकारी कल्पनेचें बीज रुज-विण्याचें काम इन्स्टिट्यूट व तिच्या घटक संस्था ह्यांनीं केलें पाहिजे. सहकाराचा संदेश अगदीं दीनदुबळ्या नागरिकापर्यंत त्याला समजेल त्या भाषेंत पोंचविला गेला पाहिजे. न जाणो, कालांतरानें शेतकरी व कामकरी ह्यांची आर्थिक व सामाजिक घडी सुधारण्याच्या ध्येयाची सहकार ही गुरुकिल्लीच होईल.

---


**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*रॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*
शाखा-मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७२,६८००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.**

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कले-क्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर.
एन. व्ही. पांडव, मॅनेजर

## चुकांपासून बोध घेऊन पुढें जा

**( सर माल्कम डार्लिंग, के. सी. आय. ई. )**

२८ वर्षांपूर्वी मी माझी पहिली सहकारी सोसायटी भारतांत स्थापन केली; तेव्हांपासून ह्या चळवळीची प्रगति मी सतत अवलोकन करीत आलों आहें. ५० वर्षांपूर्वी ज्यांनीं भारतांत ही चळवळ सुरू केली, अशांचे त्यांच्या दूरदृष्टीबद्दल व शहाणपणाबद्दल आभार मानले पाहिजेत. ते आज हयात असते तर त्यांना भारतांतील कित्येक भागांत, विशेषत: मुंबईंत, झालेली चळवळीची प्रगति पाहून आनंदाश्चर्य वाटलें असतें. त्यांच्या मागोमाग येणाऱ्यांपैकीं आम्हांला मात्र अजून किती तरी कार्य करावयाचें आहे आणि किती निस्तरावयाचें आहे, ह्याचीच जाणीव अधिक तीव्रतेनें होत आहे. आमचा अननुभव व अज्ञान ह्यांमुळें ज्या कित्येक चुका पूर्वी घडल्या, त्याचा बोध आमची जागा आतां घेणारांना होऊन येत्या पन्नास वर्षांत पुष्कळच प्रगति झालेली आढळेल, अशी आशा आहे. ही प्रगति पूर्णपणें लोकांच्या उत्साहानें घडून येईल, आणि सरकारवरील अवलंबन कमींत कमी राहील, अशीहि आशा मी व्यक्त करतों.

## उत्पादक व उपभोक्ते ह्यांचा सहकारी समन्वय

**( प्रो. जी. डी. एच. कोल, लंडन )**

हिंदी सहकारी चळवळीनें, भारतांतील परिस्थिति लक्षांत घेऊन तातडीच्या गरजा भागविण्याचा वैशिष्ट्यपूर्ण दिशेनें प्रयत्न केला पाहिजे. विशेषत: सहकारी उत्पादन व सहकारी ग्राहक ह्यांचा घनिष्ठ व फलदायी संबंध घडून येण्यास पुष्कळच वाव आहे. त्यामुळें खेड्यांतील लोकांचें जीवन सुधारण्यास पुष्कळच मदत होणार आहे.

### मुंबई राज्यांतील सहकारी चळवळ

| | | | |
|---|---|---|---|
| (१) क्षेत्रफळ (चौ. मैल) | १,११,४३४ | (१) वस्ती-खेड्यांत | २,४७,८५,८१० |
| (२) खेड्यांची संख्या | ३४,२२७ | (२) वस्ती-शहरांत | १,११,७०,३४० |
| (३) शहराची संख्या | ४९९ | एकूण | ३,५९,५६,१५० |

पहिली सोसायटी : कणगीनहाल को. क्रे. सोसायटी.

स्थापना : ( ८–५–१९०५ )

| वर्ष | सोसायट्या | सभासद | एकूण खेळतें भांडवल ( रु. ) |
|---|---|---|---|
| १९४८–४९ (विलिनीकरणापूर्वी) | १०,१३८ | १५,६९,४९२ | ६०,३६,१९,१७३ |
| १९४८–४९ ( नंतर ) | १३,३१७ | १८,६०,४८० | ६६,६१,८५,७९१ |
| १९४९–५० | १४,८१५ | २०,८३,४६० | ६८,७६,४६,७५९ |
| १९५०–५१ | १६,११५ | २३,४४,३५० | ८२,९७.०८,७८४ |
| १९५१–५२ | १७,३०४ | २५,३२,४३१ | ९३,६१,४३,९१४ |
| १९५२–५३ | १७,४५६ | २६,४८,२९६ | १०१,०२,७६,०२४ |

सहकारी चळवळींत सामील लोक—३२·५%

सहकारावरील खर्च (लक्ष रु.) : १९५१–५२ ते १९५५–५६

| १९५१–५२ | १९५२–५३ | १९५१ ते १९५२–५३ | १९५३–५४ ते १९५५–५६ | पांच वर्षें (एकूण) |
|---|---|---|---|---|
| २२·९१ | ३९·४५ | ६२·३६ | ६०·८० | १२३·१६ |

### सहकारी चळवळीची मुंबई राज्यांतील प्रगति

| | सोसायटीचे प्रकार | सोसायट्यांची संख्या | सभासद | शेअर भांडवल | रिझर्व्ह व इतर फंड | खेळतें भांडवल |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु. | रु. | रु. |
| १ | बॉंबे स्टेट को. बँक, जिल्हा बँका, इं. को बँका व बँकिंग यूनियन्स | ३४ | ५९,५४५ | १,७६,२२,३१८ | १,५१,२५,४०१ | २६,८६,९०,०७१ |
| २ | मुं. प्रां. लँड मॉर्गेज बँक | १ | ८६४ | ७,३४,३४५ | २,३४,९७६ | १,५२,०२,०९२ |
| ३ | नॉन क्रे. सोसायट्या | ७३ | ४४,३२९ | ८५,१५,६६३ | ६२,११,३२५ | २,०१,७२,२५३ |
| ४ | प्राथमिक लँड मॉ. बँका | १९ | २८,०४० | १०,४६,०२९ | ७,४१,५१४ | ९५,०३,०३५ |
| ५ | शेतकी पतपेढ्या, (मल्टि पर्पज धरून) | १०,३५७ | ८,४६,१७९ | ३,२६,००,९०३ | २,५४,४६,८०५ | १४,५०,०४,०६७ |
| ६ | शेतकी नॉन-क्रे. सोसायट्या | १,५६७ | २,९४,००९ | १,२५,०४,६०० | १,७९,२८,७१३ | ६,६१,२८,१७१ |
| ७ | बिगर शेतकी क्रे. सोसायट्या | १,५९२ | ८,७३,८३२ | ७,३२,६३,१६३ | २,६८,९२,०२० | २९,७४,२१,४६१ |
| ८ | बिगर-शेतकी नॉन-क्रे. सोसायट्या | ३,३८७ | ४,४६,४८० | ३,४४,४६,१७२ | २,००,७७,२२४ | १६,८१,८३,२७१ |
| ९ | मुं. प्रां. को. इन्स्टिट्यूट | १ | ९८२ | ...... | ...... | ...... |
| १० | सुपरवायझिंग युनियन्स, इ. | २५९ | १३,३५२ | ...... | ...... | ...... |
| ११ | विमा सोसायट्या | ९ | ४०,४६९ | ६,००० | १,८९,४४,९७३ | १,९४,९०,९६१ |
| १२ | ऑ. इं. फायर अँड ज. इं. सोसायटी | १ | १९३ | ३,२९,६०० | ३४,७८८ | ३,९६,०६२ |
| १३ | मोटर इं. सोसायटी | १ | २२ | २,९६०० | २९,५२८ | ८४,८२८ |
| | १९५२–५३ | १७,३०१ | २६,४८,२९६ | १८,१०,७१,७५३ | १३,१६,६७,२६७ | १०१,०२,७६,०२४ |
| | १९५१–५२ | १६,९३२ | २५,३२,४३१ | १५,७९,७९,१३७ | १०,९८,१७,०३० | ९३,६१,४३,९१४ |
| | वाढ | ३६९ | १,१५,८६५ | २,३०,९२,६१६ | २,१८,५०,२३७ | ७,४१,३२,११० |

## सोसायट्या व त्यांचें खेळतें भांडवल: तुलनात्मक आंकडे

| राज्य | १९५०-५१ | | १९५०-५१ | |
|---|---|---|---|---|
| | सोसायट्या | दर १ लक्ष लोकवस्तीस किती सोसायट्या | सोसायट्यांचे सभासद | खेळतें भांडवल ( रु. ) |
| मद्रास | २४,२०५ | ४२·५ | ३३,८२,४९५ | ८५,३२,४४,७२१ |
| मुंबई | १६,०७६ | ४४·८ | २२,४३,५७७ | ८२,९७,१०,९९२ |
| प. बंगाल | १५,४४१ | ६२·३ | ९,३८,०१२ | १७,७८,४१,१२१ |
| उ. प्रदेश | ३६,२११ | ५७·३ | १७,०५,५५३ | २३,०३,४३,१७० |
| मध्यप्रदेश | १०,२०२ | ४८·१ | ४,११,७१४ | ९,७२,५६,०८९ |
| पंजाब | १४,०५२ | ९१·८ | ७,४२,९२२ | १२,५२,५०,४७२ |
| बिहार | १४,५४८ | ३६·२ | ६,३५,८४६ | ५,२०,४०,५३४ |
| ओरिसा | ५,१४५ | ३५·२ | २,८२,५९६ | ४,२७,४६,०१४ |
| आसाम | २,९२९ | ३२·५ | २,८३,९६० | १,९५,६१,१९६ |
| म्हैसूर | ५,१९० | ५७·० | ४,९४,८२२ | ६,९०,९०,९०४ |
| हैद्राबाद | १५,०७७ | ८१·१ | १४,५६,४७८ | १०,१३,२८,२३५ |
| मध्यभारत | ६,६०१ | ८३·६ | १,७७,०३६ | ४,१३,७८,८३१ |
| राजस्थान | ३,१५१ | २०·६ | १,४०,७३५ | २,२८,६९,८३३ |
| त्रावणकोर-कोचीन | २,६३१ | २८·३ | ३,५३,३४५ | २,६५,२४,८५९ |
| पेप्सु | १,४५३ | ४१·५ | ४२,७३२ | १,५४,६४,९६३ |
| जम्मू-काश्मीर | ३,२८८ | ... | १,६९,५४८ | १,३८,५६,९२४ |
| सौराष्ट्र | ७,६७ | १८·७ | ४१,३४७ | ५१,२१,४३२ |
| अजमीर | ९,६७ | १३८·१ | ३३,५९७ | ८२,०९,२९७ |
| भोपाळ | २,६५ | ३३·१ | १०,८६३ | १४,२२,४२५ |
| दिल्ली | ९८३ | ५७·८ | ६०,२६७ | १,५७,९०,३१६ |
| कूर्ग | ३५६ | १७८·० | ४८,२५५ | ५८,४२,३३९ |
| हिमाचल प्रदेश | ८४३ | ८४·३ | २३,९८२ | २१,३६,७८३ |
| विंध्य प्रदेश | ४६४ | १२.९ | १०,६८२ | ३,९३,६२८ |
| माणिपूर | ३२८ | ५४·७ | १५,३६९ | ७,०८,६२९ |
| त्रिपुरा | ९ | १·५ | ६५३ | १,५४,९५० |
| अंदमान-निकोबार | ७ | ... | ६३४ | २,३५,६६९ |
| एकूण | १,८१,१८९ | ५०·६ | १,३७,१५,०२० | २,७५,८५,२३,९५६ |

### महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय शिक्षण विभाग

संग्रहालयाच्या विद्यमानें, दिनांक १ मे १९५४ ते ३१ मे १९५४ पर्यंत दररोज (बुधवार खेरीज करून), पुढील तीन व्याख्यानमाला लक्ष्मी-पथावरील कॉमन्वेल्थ इमारतींतील सभागृहांत चालविण्यांत येणार आहेत. व्याख्यानांचें माध्यम मराठी असून श्रोत्यांना प्रवेश विनामूल्य आहे.

| | वेळ |
|---|---|
| ( १ ) चित्रकला व्याख्यानमाला | सकाळीं |
| चित्रकलेचा सांगोपांग अभ्यास व विचार | ८-० ते ९-०० |
| ( २ ) शास्त्रीय व्याख्यानमाला | सकाळीं |
| मूळ शास्त्रें किंवा उपशास्त्रें यांची ओळख | ९-३० ते ११-०० |
| ( ३ ) व्यावसाईक-मार्ग-दर्शन-माला | दुपारीं |
| तज्ज्ञांकडून व्यवसायांची प्राथमिक ओळख | ४-३० ते ५-३० |

तपशीलवार कार्यक्रम सभागृहांत ठेवण्यांत येईल.

भा. वि. घारपुरे,
क्युरेटर.


## महाराष्ट्र रिजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल,

नं. ५ बी. जे. रोड, पुणें १.

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें मराठी भाषेंतून सहकारी शिक्षण देणारी महाराष्ट्रांतील एकमेव संस्था.

या विद्यालयाचे पुढील शिक्षण वर्ग दिनांक २ जुलै १९५४ पासून सुरू होतील. प्रवेश दिनांक १५ जून १९५४ पर्यंत दिला जाईल.

या विद्यालयांत सहकारी खात्यांतील सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी-विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाचे नोकरवर्गास लागणारें शिक्षण दिलें जातें. शिक्षणक्रम संपल्यानंतर परीक्षेंत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना "को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा" देण्यांत येतो. विद्यालयांत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सहकारी खातें व सहकारी संस्थांमध्यें नोकरी देतेवेळीं प्राधान्य दिलें जातें.

अधिक माहितीसाठीं लिहा.— सुपरिन्टेन्डेन्ट,
महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें.

## दूरदृष्टीच्या सहकारी कार्यकर्त्यांची उणीव

( रा. य. बोरकर )

अलिकडील जनताच या चळवळींत स्वयंस्फूर्तीनें भाग घेत नाहीं, असेंच प्रत्ययास येतें. प्रचलित कायद्याच्या आधारावर सोसायट्या स्थापन करतां येतात म्हणून त्या स्थापन होऊन चळवळीचा मोठा पसारा दिसत आहे, इतकेंच. परंतु यांतून भाग घेणारांची संख्या फारच अल्प असून त्यांना सुद्धां संस्थेची आस्था आहे असें बिलकुल नाहीं. जनतेंत ही आस्था वाढविण्यासाठीं तसेंच उलट संस्थेचा फायदा घेण्यासाठीं हुशार पण लबाड लोक त्यांत शिरून संस्थेचें अकल्याण करणार नाहींत याबद्दल जागरूक राहिलें पाहिजे. प्रामाणिकपणा हा सहकारी तत्त्वाचा आत्मा आहे. त्यास अनुसरून ज्या सहकारी संस्था प्रामाणिकपणानें चालविल्या गेल्या अगर जातात त्यांतील सभासदांचा खूपच फायदा झाला व होतो हेंहि उदाहरणानें पटवून दिलें पाहिजे. एखादी सहकारी संस्था अयशस्वी ठरली तर तिजकडे बोट दाखवून सर्व सहकारी संस्थांच्या मुळावरच घाव घालण्यास कांहीं तयार होतात, त्यासहि परावृत्त केलें पाहिजे.

परंतु या सर्व गोष्टी घडवून आणण्यास सहकारी कार्यकर्त्यांचीच वानवा आहे, असें खेदानें म्हणावें लागतें. कारण, सहकारी चळवळींतील कार्यकर्ते म्हणून संस्थांच्या संचालक मंडळावर काम करणारे सभासदच तेवढे आपणांस पुढें दिसतात. जुन्या कार्यकर्त्यांची तसेंच संस्थेंतील इतर सभासदांची उपस्थिति नसतेच असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. वास्तविक सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर ज्यांनीं पूर्वी कामें केलीं आहेत त्यांनीं आपला कार्यभाग संपला असें न मानतां नवीन येणाऱ्या पिढीस मार्गदर्शन करून संस्थेबाबत आस्था ठेवून तींत स्वार्थी लोकांचें वर्चस्व होणार नाहीं व संस्थेच्या इभ्रतीस धक्का बसणार नाहीं अशाबद्दल जागरूक राहिलें पाहिजे व त्यांचें अनुकरण संस्थांतील इतर सभासदांनींहि करणें जरूर आहे. परंतु आजपर्यंत झालेल्या संस्थांच्या कार्याचा एकत्रित असा आढावा कार्यकर्त्यांनीं अगर सरकारनें घेऊन त्याचा विचार केलेला दिसत नाहीं. उदाहरणार्थ शेतकी सोसायट्यांची परिस्थिति लक्षांत घ्या. या सोसायट्या आपल्या जिल्ह्यांत कितीतरी मोठ्या संख्येनें काम करीत आहेत. त्यांच्या संख्येंत झपाट्यानें वाढ होत गेली व होत आहे परंतु त्यांच्या कार्यक्षमतेमध्यें पुच्छप्रगतीच दिसून येते. अशा सोसायट्यांपैकीं कितीतरी सोसायट्या सालोसाल तोट्यांत चालल्या आहेत. परंतु याचा अद्याप सर्वांनीं एकत्र येऊन कधींच विचार केलेला नाहीं व त्याचीं कारणें शोधून काढलीं नाहींत. प्राथमिक सोसायट्या कार्यक्षम ठरल्या नाहींत तर त्यांची झळ मध्यवर्ती बँकेस लागल्याशिवाय राहणार नाहीं व तसें झाल्यास सहकारी चळवळीवरील जनतेचा विश्वास व निष्ठा कमी होईल या गोष्टीचा विचार दूरदृष्टीनें वेळींच झाल्यास बरें.

---

### कपाशीच्या लागवडींत व उत्पादनांत वाढ

भारतांत १९५३-५४ मध्यें १,५०,५३,००० एकर जमिनींत कपाशीच्या पिकाची लागवड झाली असावी आणि त्यापासून ३२,६६,००० गांसड्या उत्पादन होईल असें समजतें. म्हणजे यंदा लागवडीच्या क्षेत्रांत १३,८१,००० एकरांनीं आणि उत्पादनांत ७,७९,००० गांसड्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येतें.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें; पेंड.
★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.
★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.
★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.
★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.
★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

## शेती पतयोजना यशस्वी झाली काय ?

( लेखक : यशवंत दत्तात्रय खोले )

मुंबई प्रांतांत शेतीकर्ज पुरवठ्याच्या चळवळीची पुनर्घटना होऊन सुमारें चार वर्षे झालीं व ही चळवळ कितपत यशस्वी झाली यासंबंधीं तपशीलवार व संशोधक दृष्टीनें पाहणी होणें जरूर आहे. या संबंधीं उपलब्ध असलेल्या माहितीवरूनच ठोकळ मानानें निष्कर्ष काढणें जरूर असल्यानें तसा प्रयत्न या लेखांत करण्याचें योजलें आहे.

आपला देश मुख्यत: शेतीप्रधान आणि तीही शेती पुष्कळ-अंशीं अनिश्चित पडणाऱ्या पावसावर अवलंबून, म्हणून शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या तुटीचा समजला जातो. त्यांतच ठराविक भागांत दुष्काळांची झळ लागत असल्यानें शेतकऱ्यांचे मनस्वी हाल होतात व होत असत. शेतकऱ्यांना फार पूर्वींपासून खाजगी सावकाराकडे कर्जासाठीं जावें लागत असे. सावकारी संस्था शेतकऱ्यांस व समाजास जशी उपकारक तशी ती अपायकारकहि झाली आणि पुढेंपुढें सावकारी संस्थेपासून मुख्यत: शेतकरी समाजास होणारी अडवणूक व त्यामुळें होणारें असमाधान व अतिप्रसंग टाळण्यासाठी सरकारला कायदे करणें प्राप्त झालें. केवळ कायदे करून शेतकऱ्यांची आर्थिक गरज भागण्यासारखी नव्हती अगर सरकारी तगाई कर्जें देऊनहि सोय होण्यासारखी नव्हती म्हणून त्यावेळेचे सरकारनें आपला एक सरकारी अधिकारी पाश्चिमात्य देशांत पाठवून तेथील उपाययोजनेसंबंधी माहिती गोळा करून असा निष्कर्ष काढला कीं सहकारी तत्त्वावर कर्ज पुरविण्याची योजना देशांत अस्तित्वांत येणें जरूर आहे. याप्रमाणें सन १९०४ सालीं सहकारी सोसायट्या संबंधीचा कायदा झाला व त्यान्वयें प्रथम शेती पेढ्यांची स्थापना झाली व त्यामार्फत शेतकऱ्यांस कर्ज पुरविण्याची व्यवस्था झाली.

देशांत अशा तऱ्हेनें शेतकऱ्यांना कर्ज पुरविण्याची सोय झाली तरी सरकारी तगाई कर्जें व सावकरी कर्जें यांचे व्यवहार चालू होतेच. सहकारी संस्थामार्फत मिळणारीं कर्जें प्राय: जामिनीच्या तारणावर मिळत. त्यांची उपयुक्तता अगर परतफेड यासंबंधी शास्त्रीय अशी मांडणी नव्हती. त्यांतूनच दुष्काळ, शेती मालाचे अनिश्चित भाव व कर्ज मिळण्यास लागणारा अवधी वगैरे कारणामुळें सहकारी संस्थांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. दुसऱ्या महायुद्धाचे शेवटीं युद्धोत्तर पुनर्रचनासंबंधीं योजना सुरू झाल्या व त्याप्रमाणें सरकारी कचेऱ्यामध्यें हालचाली सुरू झाल्या, सहकारी नियोजन समितीहि स्थापन झाली व त्याबरोबरच मध्यवर्ती सरकारनें प्रा. ध. रा. गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली समिति नेमून शेती कर्ज व्यवस्थेबाबत चौकशी करून अभिप्राय देण्याचें काम सोपविलें. या समितीनें चौकशी करून आपला अभिप्राय दिला कीं (१) शेतकऱ्यांस त्यांच्या परतफेडीच्या ऐपतीप्रमाणें पिकासाठी व शेतीसुधारणेसाठी योग्य व्याजाचे दरानें कर्ज मिळावें, (२) असें कर्ज निश्चित व हंगामाचे वेळीं मिळावें. (३) कर्जाची परतफेड त्या पिकाचे विक्रीचे रकमेंतून व्हावी. (४) शेतकऱ्यांचे कर्जाचा बोजा त्यांच्या परतफेडीच्या ऐपतीप्रमाणें कायद्यानें कमी व्हावा व या कार्यासाठी प्रत्येक प्रांतांत सरकारनिर्मित पैसे पुरविणारी संस्था असावी व शक्य झाल्यास हें काम सहकारी संस्थामार्फत चालावें.

या समितीच्या शिफारशीप्रमाणें मुंबई प्रांतांत शेतकऱ्यास कर्ज पुरविण्याचें काम सहकारी संस्थांनी घेतलें व त्यासाठी मुंबई सरकारनें सहकारी बँकांच्या भागासाठी ५० लाख रुपये देऊं केलें. शिवाय रिझर्व्ह बँकेनेंहि ३–३॥ कोटी पर्यंत सवलतीचे दरानें प्रांतिक सहकारी संस्थामार्फत शेतव्यवसायासाठी अगदीं कमी व्याजानें शेती उत्पादनासाठी कर्ज देण्याचें मान्य केलें आणि त्याचा दृश्य असा फायदाहि झाला. नुकत्या मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांना सुमारें ३॥ कोटीच्यावर असें कर्ज रिझर्व बँकेनें उपलब्ध केलें; एवढेंच नव्हें तर मध्यम मुदतीसाठीं शेतकऱ्यांस कर्ज देतां यावें म्हणून रिझर्व्ह बँक कायदाहि नुकतांच दुरुस्त केला.

ही सर्व व्यवस्था होत असतां या योजनेमधील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे (१) शेती संवर्धनासाठीं प्रत्येक पिकाच्या कर्जाच्या मर्यादा ठरविणें (२) अशा कर्जाच्या मर्यादा ठरल्यानंतर त्या तीन वर्षेपर्यंत अंमलांत राहणें (३) मंजूर कर्ज मर्यादेप्रमाणें बँकेच्या स्थानिक अधिकाऱ्यांना त्याप्रमाणें कर्ज देण्याचे अधिकार असणें (४) पिकांचे हंगामांत व त्याच्या विक्रीमधून कर्ज वसूल होणें हा होय. प्रा. ध. रा. गाडगीळ यांच्या मतें या पैकीं अद्याप यशस्वीपणें कोणचाच भाग होऊं शकला नाहीं व मूळ योजनेमागील तत्त्वप्रणाली अजून कोणाच्या पचनीं पडूं शकली नाहीं. ज्यांच्याकडे या योजनेचें अंमलबजावणी करण्याचें काम आहे ते म्हणजे प्रांतिक सहकारी बँक व मध्यवर्ती बँक यांच्या अधिकाऱ्याचें म्हणणें असें कीं, तात्त्विक दृष्टीनें पुनर्घटनेची योजना जरी योग्य असली तरी तपशीलाचे दृष्टीनें त्यांत अडचणी आहेत. त्यामध्यें मुख्य अडचण म्हणजे शेती मालाची विक्री करून देणाऱ्या मजबूत अशा मालविक्रीच्या संघटना नाहींत. सहकारी सोसायट्यावरील देखरेखीचें काम बँकांकडे यावें. दुसरें असें कीं शेतकऱ्यांना पिकाचें उत्पन्नांतून कर्जफेड करणें व्यवहारत: अडचणीचें होईल. कारण सहकारी संस्थामार्फत मिळणारें कर्ज हें फक्त शेती उत्पादनासाठी मिळणारें आहे. त्यांत त्यांच्या इतर गरजा भागत नाहींत व जर कर्जफेडीची व्यवस्था केवळ शेतीमालाचे विक्रीमधूनच करावयाची म्हटली तर शेतकरी आपलें कर्ज फेडणार नाहीं व त्यामुळें थकबाकी वाढेल व ही थकबाकी कमी करण्याचे दृष्टीनें जुनें कर्ज फेडावें व नवीन कर्ज यावें लागतें.

एकंदर परिस्थितीचें सिंहावलोकन करतां एक गोष्ट निश्चित कीं, नवीन शेती कर्ज व्यवस्थेबाबत खालपर्यंत योग्य तऱ्हेनें माहिती झालेली दिसत नाहीं. नवीन योजनेमुळें मिळणारें कर्ज व जुन्या पद्धतीनें मिळणारें कर्ज यांच्या रकमेमध्येंहि मोठा फरक झाला आहे. अगदीं आंकड्यांतच बोलावयाचें झाल्यास सन १९४८-४९ सालीं सहकारी पतपेढ्यांची संख्या १३,३१७ होती ती १९५२–५३ मध्यें १७,३०१ झाली व त्यामध्यें केवळ शेतकी पतपेढ्या व विविध कार्यकारी सोसायट्यांची संख्या १०,३५७ होती. सभासद संख्या या कालांत अनुक्रमें १७·८६ लक्ष २५·२९ लक्ष होती. वरील यादीप्रमाणें सोसायट्यांच्या खेळत्या भांडवलांत व दिलेल्या कर्जांतहि वाढ झाली. १९५२–५३मध्यें वरील प्रकारच्या पतपेढ्यांचे खेळतें भांडवल १४,५०,०४,०६७६. होतें, तर सन १९४८–४९ सालीं बँक व सोसायट्या यांजकडील येणें कर्ज रुपये ११८३ हजार रुपये होते. तें सन १९५२–५३ सालीं ११,२९,४३,१६४ होतें. या सर्व आंकड्यांचा अर्थ असाच कीं, नवीन पुनर्घटित चळवळीमुळें सहकारी सोसायट्यांनीं आपल्यावरील आर्थिक जबाबदारी मोठी स्वीकारली व ती स्वीकारली असतां त्याप्रमाणें वागण्याची जबाबदारी त्यांचेवर आली. या नवीन पद्धतीमधील मुख्य अडचण अशी कीं शेतकऱ्यांच्या शेतीविषयक अडचणी

सोडविण्याची व्यवस्था झाली परंतु त्यांच्या इतर आर्थिक गरजा भागविण्याची तरतूद नाहीं. तसेंच पिकास व वसुलीस कर्जवसुलीची व्यवस्था ही त्याच्या प्रकृतीस मानवत नाहीं. शेती उत्पादनास भरपूर कर्ज देऊनाहि जर पिकाचे विक्रीतून कर्ज फिटणार नसलें तर मोठाच अनवस्था प्रसंग उत्पन्न होणार आहे. ही गोष्ट खरी कीं, पीक कर्जाच्या मर्यादा ठरवितांना त्यामध्यें कोणत्या खर्चाच्या बाबींचा समावेश करावयाचा यांचा अद्याप शास्त्रीय दृष्टीनें विचार झाला नाहीं; केवळ बी-बियाणें अगर खतें यांच्या खर्चाचा विचार न करतां त्यामध्यें शेतकरी व त्याचें कुटुंब यांच्या श्रमाचाहि विचार व्हावयास पाहिजे. सहकारी चळवळ ही आतां चळवळ म्हणून राहिली नसून देशांतील अर्थव्यवस्थेंतील एक भाग झाला. गेल्या पन्नास वर्षांत या चळवळीची जी वाढ झाली ती समाजास मदत करण्याचें दृष्टीनें झाली व त्यामुळें केवळ कांहीं नियमित समाजास त्याचा उपयोग झाला. तो कालखंड संपून आतां नवीन कालखंडास सुरवात झाली असल्यानें आतां 'सहकार' ही चळवळ राहिली नसून ती एक आवश्यक अशी बाब झाल्याचें पुणें येथील सहकार सुवर्ण महोत्सवानिमित्त झालेल्या जाहीर सभेंत प्रा. ध. रा. गाडगीळ यांनीं सांगितलें. सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेबाबत विचारविनिमय चालू असतां व त्यासंबंधी चर्चा चालू असतां हें भविष्य वर्तविलें गेलेंच होतें. सहकारी चळवळीचें जुनें स्वरूप बदलणार, त्याची पूर्वीची तत्त्वें यांना मुरड घालावी लागणार व सहकारी चळवळीमध्यें आर्थिक गरज भागविण्यासाठीं येणारा सभासद याची या चळवळीवर निष्ठा असो किंवा नसो त्यास या नवीन अर्थव्यवस्थेंत स्थान आहे, याची जाणीव त्यावेळीं कित्येक कार्यकर्त्यांत झाली. आतां खरोखर विचाराचा प्रश्न असा कीं चार वर्षांपूर्वीं घेतलेली जबाबदारी त्यावेळीं मान्य केलेल्या धोरणानें पार पाडणें व तसें करीत असतांना आलेल्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणें अगर ही जबाबदारी व त्यांतील धोरणाप्रमाणें काम करणें कठीण आहे असें वेळींच जाहीर करून त्यामधून बाहेर पडणें हा एकच मार्ग आहे. गेल्या चार वर्षांच्या प्रगतीचा आढावा घेतांना झालेलें काम सोसायट्यांच्या संख्येच्या दृष्टीनें त्यांत ज्यांना आर्थिक सहाय्य मिळालें त्यांच्या व रकमेच्या दृष्टीनें गांठलेली मजल बरीच आहे हें मान्य करावयास पाहिजे परंतु ही मजल गांठतांना ज्या पद्धतीनें मार्ग आक्रमण केला जात आहे त्या पद्धतीबद्दल मतभेद आहेत. आज सहकारी चळवळीबद्दल असें बोललें जातें कीं, नवीन कार्यकर्ते यत नाहींत, आल्यास ते त्यामध्यें टिकत नाहींत व त्यामुळें विस्तार पावलेल्या चळवळीच्या कार्यक्षमतेबद्दल शंका उत्पन्न होते. या सर्वच दृष्टीनें आतां तावडतोब आत्मनिरीक्षण करून आतां असलेल्या अडचणींचा विचार करून त्या दूर करण्याचा प्रयत्न करणें व नवीन जबाबदारी यशस्वी झाली असें आव्हानपूर्वक सांगण्याची जबाबदारी सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यावर आली आहे व ते ती जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडतील असें निश्चित वाटतें. नवीन सहकारी अर्थव्यवस्थेंत व मुख्यतः शेती पतपेढ्यांच्या पुनर्घटित चळवळींत लोकनियुक्त कार्यकर्त्यांना थोडें मर्यादितच काम राहणार हें निश्चित. तेव्हां त्याच्यावर जबाबदारीहि मर्यादितच राहणार असें वाटतें.

---

**ट्रेनिंग कॉलेजला रेडिओ मिळाला**—वाई येथील ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं व शिक्षकांनीं आपल्या सहकारी भांडारामार्फत चालू वर्षीं झालेल्या व्यवहारांतून जो फायदा झाला त्याचा विनियोग करून संस्थेसाठीं एक रेडिओ सेट विकत घेतला.


खटाव तालुका

# शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघ, लि.

(वडूज)

(१८-९-४८)

(१) भरलेलें भाग भांडवल .... रु. १२,३३०

(२) रिझर्व्ह व इतर फंड्स .... रु. २९,३००

शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजा पुरविणारी खटाव तालुक्यांतील एकमेव सहकारी संस्था

बाबुराव तात्याजी गोडसे,
चेअरमन

विठ्ठलराव भाऊसाहेब खुरपे
मॅनेजर

---

# दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ पूर्वीची दि जमखंडी स्टेट सेंट्रल को. बँक लि. जमखंडी ]

मुख्य कचेरीः- जमखंडी

स्थापना सन १९४० ] [ शाखा:— बनहट्टी

## फक्त तेरा वर्षांतील प्रगतीचे आंकडे !

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | १,९५,५८० |
| ठेवी | रु. | १२,३१,०४६ |
| गंगाजळी | रु. | १,८९,८१३ |
| खेळतें भांडवल | रु. | १६,७६,२६१ |

- भांडवलावर नफावाटणीचें साधारण प्रमाण : ५ टक्के
- प्रमुख विमाकंपन्यांची हप्ते वसुलीचीं खातीं !
- मध्यवस्तींत स्वतःची भव्य इमारत !
- सेफ डिपॉझिट व्हॉल्टचें बांधकाम चालू !
- अनुभवी व शिक्षित नोकरवर्ग !
- ठेवींवर आकर्षक व्याज !
- ऑडिट वर्ग 'अ'

—सर्व तऱ्हेचे बँकेचे व्यवहार केले जातात—

चेअरमन, श्री. म. अथणी

मॅनेजर, म. द. खाडिलकर

## शेतकी बँका काढण्याचा ७० वर्षांपूर्वीचा प्रयत्न

सुमारें सत्तर वर्षांपूर्वी शेतकी बँका स्थापन करण्यासाठी महाराष्ट्रांत जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांचा बहुतेकांना विसर पडलेला दिसतो. तथापि, तेव्हा जर हे प्रयत्न यशस्वी झाले असते तर आज शेतीची इतकी निकृष्टावस्था झालीहि नसती.

शेतकऱ्यास जमिनीची सुधारणा करण्यास, मागील देणें भागविण्यास वगैरे कामांसाठी भांडवल लागतें, तें कमी व्याजानें मिळवून देणें, हें शेतकी बँकेचें मुख्य काम होय. या कर्जाची फेड दीर्घ मुदतीनें करावयाची असते व यामुळें नेहमींच्या बँका किंवा सावकार यांचेकडून असें कर्ज मिळणें अशक्य असतें. महाराष्ट्रामधील शेतकऱ्यांचें दारिद्र्य तर विशेषच प्रसिद्ध आहे. तेव्हां सरकारी मदतीनें शेतकी बँका स्थापन करण्यासाठी १८८२ ते १८८९ च्या दरम्यान जी खटपट करण्यांत आली त्याची थोडक्यांत हकीगत खाली दिली आहे.

### पुरंदर तालुक्यांत शेतकी बँक

२० नोव्हेंबर, १८८३ रोजीं पुणें येथें प्रमुख लोकांची एक सभा भरून, शेतकी बँकेच्या योजनेसंबंधी सरकारी सहानुभूति मिळविण्यासाठीं गव्हर्नर साहेबांकडे शिष्टमंडळ नेण्याचें ठरलें, व लागलीच रावबहादुर मुदलियार यांचे प्रमुखत्वाखाली या शिष्टमंडळानें गव्हर्नरसाहेबांची गांठ घेतली, आणि पुरंदर तालुक्यापुरती प्रयोगाखातर एक शेतकी बँक काढण्यास सरकारी मदत मागितली. त्यावेळीं पुरंदर तालुक्यामधील शेतकऱ्यांना एकूण ६,५०,००० रुपये कर्ज असावें, असा अंदाज होता. एवढी रक्कम सरकारनें नियोजित बँकेस चार टक्के दरानें दोन वर्षांच्या मुदतीनें कर्जाऊ द्यावी, अशी विनंति करण्यांत आली. बँकेनें ही रक्कम शेतकऱ्यांचें पूर्वीचें कर्ज निवारण्यासाठीं उपयोगांत आणावी अशी योजना होती. स्टँप ड्यूटी, कोर्ट फी, इत्यादींची माफी मिळावी, अशीहि विनंति करण्यांत आली. गव्हर्नरसाहेबांनीं योजनेस सहानुभूति दाखविली.

शेतकी बँकेच्या योजनेस विलायतेमध्येंहि पाठिंबा मिळावा, म्हणून खटपट करण्यांत आली. सर विल्यम वेडरबर्न हे फर्लोरजेवर असतांना त्यांनीं विशेष मेहनत घेऊन इंग्लंडमध्येंहि एका कमिटीची स्थापना केली व योजनेस प्रमुख लोकांची सहानुभूति मिळविली. त्यांनीं 'मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्स' पुढें व्याख्यानहि दिलें. खुद्द 'लंडन टाइम्स' पत्रानें बँकेच्या योजनेची स्तुति केली व अशा बँका हिंदुस्थानांत स्थापन झाल्यास ब्रिटिश कारखानदारांनाहि पर्यायानें फायदा होईल, हें दाखवून दिलें.

### बँकेच्या योजनेचें स्वरूप

पुण्याच्या सभेनें नेमलेल्या कमिटीची योजना अशी होती, कीं सरकारकडून कर्ज घेऊन त्यांतून बँकेनें पुरंदर तालुक्यामधील अगदींच ऋणबद्ध शेतकरी सोडून बाकी सर्व शेतकऱ्यांना कर्जें द्यावीं व त्यांना ऋणमुक्त करावें. त्यांच्या सावकारांचें देणें देऊन टाकावें, व बँकेनें शेतकऱ्याची सर्व जमीन लावून घ्यावी. बँकेला शेतकऱ्यांकडून बारा टक्क्यांपेक्षा जास्त व्याज घेतां येऊं नये, व मुद्दल व व्याज वसूल करण्यास सरकारी रेव्हिन्यू खात्यानें मदत करावी. त्याचप्रमाणें स्टँप व कोर्ट फीची सरकारनें माफी द्यावी व वीस वर्षेंपर्यंत सारा वाढविणार नाहीं, अशी सरकारनें हमी द्यावी. अशा रीतीनें शेतकऱ्यांना लांब मुदतीचें कर्ज देण्यापूर्वी त्याचें पहिलें एकूण कर्ज किती आहे, हें ठरवावें लागेल. तें ठरविण्यासाठी एक कमिशन नेमण्यांत यावें.

स्थापना सन १९३५ टे. नं. ३४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९४,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ८६,००० हून अधिक |
| ठेवी | रु. ६,७९,००० |
| खेळतें भांडवल | रु. ९,४५,००० |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी.,
( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पा. ठोरे,
श्री. शं. कों. डुंबरे, श्री. म. बा. बेंडे, श्री. भि. कृ. पापडे,
श्री. खं. स. काळे, डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

मुख्य कचेरी : हायस्कूल रोड, सांगली. ( स्थापना १९२७ ) शाखा : (१) जत, (२) मिरज, (३) तासगांव

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,००,५४० |
| गंगाजळी व इतर फंड्स | ... | रु. १,७१,२५१ |
| खेळतें भांडवल | ... | रु. १४,१९,००० |

● सहकारी संस्थांना माफक दरांत कर्जपुरवठा केला जातो.
● बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) श्री. आर. बी. आरवाडे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन, (२) श्री. व्ही. पी. पोवार, बी. ए., एलएल. बी., व्हा. चेअरमन, (३) श्री. एम्. एच्. गोडबोले, बी. ए., एलएल. बी., एम. एल. सी., (४) श्री. के. ए. चौगुले, बी. ए., एलएल. बी. (५) श्री. बी. ए. दप्तरदार, बी. ए., (६) श्री हिंदुराव एम. पाटील. (७) श्री. सुबराव ए. पाटील (८) श्री. जे. व्ही. करमरकर, (९) श्री. ए. एन्. खानविलकर, (१०) श्री. जी. के. मोगली, बी. ए., (११) श्री. विठ्ठलराव बी. देशमुख, (१२) श्री. डी. बी. सूर्यवंशी, एम. एल. ए., (१३) श्री. हंसाजीराव बी. पाटील, (१४) श्री. एम. व्ही. चरणकर, (१५) मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सांगली.

वाय. एस. बोरगांवकर, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. | आर. बी. आरवाडे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

ही सर्व व्यवस्था बँकेच्या स्थापनेपूर्वी व्हावी, अशी कमिटीनें सरकारकडे विनंती केली होती.

कमिटीच्या योजनेवर सर्वे व सेटलमेंट कमिशनरनें दिलेलें मत मनोरंजक आहे. सरकारनें एका खाजगी बँकेची कर्जे वसूल करण्यास मदत केली, तर त्याचे राजकीय परिणाम हितावह होणार नाहींत, व शेतसाऱ्याबरोबर बँकेचे हप्ते वसूल केल्यास शेतकऱ्याचा सरकारवरील विश्वास उडेल, असें त्याचें म्हणणें होतें. पुण्याची कमिटी, सर विल्यम वेडरबर्न, मुंबई सरकार, हिंदुस्थान सरकार व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचा परस्परांमध्यें दोन वर्षे पत्रव्यवहार चालू होता. सरकारी रेव्हिन्यू खात्यानें बँकेच्या कर्जवसुलीच्या भानगडींमध्यें पडूं नये, असा सरकारी धोरणाचा रोख होता; उलटपक्षीं अशी मदत बँकेस अत्यंत आवश्यक आहे, बँकेनें खटपट करूनहि हप्त्यांची वसुली झाली नाहीं. तर सरकारी मदत आम्हीं मागूं, असें कमिटीचें म्हणणें होतें. बँकेच्या डिबेंचरावरील व्याजाचीहि सरकारनें हमी घ्यावी असें कमिटीनें सुचविलें होतें, आणि सरकारी हिशेबतपासनिसांनीं बँकेचे हिशेब तपासण्यास कमिटीची हरकत नव्हती.

### स्टेट सेक्रेटरीनें योजना फेटाळली

सेक्रेटरी ऑफ स्टेटनें सर्वच योजना धुडकावून लावली. संयोजित बँक म्हणजे एक सरकारीच बँक होईल, तिला विशेष सवलती द्याव्या लागतील, कमी दरानें सरकारकडून व्याज घेऊन त्यावर बँक मधल्यामध्यें नफा मिळवील, डिबेंचर्सला तारण मिळणार नाहीं, बँकेच्या कारभारानें शेतकऱ्यांच्या सर्व अडचणींचें निवारण होणार नाहीं, रेव्हिन्यू अधिकाऱ्यांनीं कर्जवसुलीस मदत करणें श्रेयस्कर होणार नाहीं, इत्यादि मुद्दे पुढे मांडले. शेतकऱ्यास न्याय मिळावा, व तोहि लवकर व स्वस्त मिळावा, अशी सरकार खबरदारी घेईल, आणि शेतकऱ्याच्या अज्ञानामुळें व अशिक्षितपणामुळें त्यांचें नुकसान होऊं देणार नाहीं. परंतु खोलांत हात घालणें राजशासनाच्या तत्त्वास धरून होणार नाहीं,असा त्यानें अभिप्राय दिला. इजिप्तमध्यें शेतकी बँका आहेत त्यासंबंधीं त्यानें माहिती मागविली, व तेथील व हिंदुस्थानमधील परिस्थिति भिन्न आहे या सबबीवर सरकारी मदतीनें या देशांत शेतकी बँका स्थापण्याचे विरुद्ध मत दिलें. पुण्याच्या कमिटीनें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या विधानांना पूर्णपणें उत्तरें दिलीं, परंतु त्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं.

### न्या. रानडे ह्यांची स्फूर्ति

अशा रीतीनें, सत्तर वर्षांपूर्वी महाराष्ट्रामध्यें शेतकी बँका स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यांत आला, व तो अयशस्वी झाला. बिन–सरकारी हिंदी लोकांप्रमाणें सर विल्यम वेडरबर्नसारख्या युरोपिअन अधिकाऱ्यांनीहि खटपट केली. न्या. महादेव गोविंद रानडे हे या योजनेच्या मुळाशीं होते, व त्यांच्या स्फूर्तीनेंच हे सर्व प्रयत्न झाले. विलायतेमधील लोकमतहि अनुकूल होतें. अशा बँका स्थापन झाल्यास ब्रिटिश भांडवल गुंतविण्यास एक उत्तम संधि मिळेल व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति सुधारल्यास पुढें ब्रिटिश माल हिंदुस्थानांत जास्त खपेल अशी तेथील व्यापाऱ्यांना आशा वाटत होती. मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकारहि या योजनेस प्रतिकूल नव्हतें; तथापि "सरकारनें आर्थिक बाबतींत हात घालूं नये" या "खुल्या व्यापारा"च्या तत्त्वाचा पुरस्कार त्यावेळीं जोरानें होत असल्यानें व इतर राजकीय कारणांसाठी ही योजना फेटाळून लावली गेली.


## श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

फलटण

( स्थापना १९२६ )

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | अधिकृत | रु. | १,००,००० |
| | वसूल | रु. | १,१५,००० |
| बँकेचे फंड : | रिझर्व्ह फंड | रु. | १८,००० |
| | इतर ,, | रु. | १,१०,००० |
| ठेवी : | | रु. | ११,६१,००० |

करंट, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात व बँकेचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

—अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें—

सहकारी चळवळीच्या सुवर्णमहोत्सव सुप्रसंगीं सर्वांचें हार्दिक स्वागत करून भारताच्या सहकारी संघराज्याच्या ध्येयास सुयश इच्छित आहोंत.

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., व्यवस्थापक.

वि. शं. झिरपे, B. A., LL. B., अध्यक्ष.



महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत अग्रस्थानीं असलेली

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना : सन १९१०

हेड ऑफिस : अहमदनगर शहर

शाखा:-१ संगमनेर ( जि. नगर ) २ बेलापूर रोड-श्रीरामपूर ( जिल्हा नगर ) ३ वांबोरी ( जि. नगर. )

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,६८,९७० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | १,६४,३९१ |
| (४) इतर फंड | रु. | ३,१५,२३८ |
| (५) चालू ठेवी | रु. | ३०,७३,०८३ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ८,५९,३८३ |
| (७) मुदत ठेवी | रु. | १७,३४,४१० |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ६७,०१,६११ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जे दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदीविक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

त्र्यं. वि. निसळ, मॅनेजर — कृ. ज. जोशी, जनरल मॅनेजर — मो. कुं. फिरोदिया, चेअरमन

## सोवियत युनियनमधील सहकारी संस्थांमार्फत मालाची विक्री

निर्मात्यांच्या व कारागिरांच्या सहकारी संस्था सोविएत युनियनच्या अर्थव्यवस्थेंत एक महत्त्वाचें कार्य पार पाडीत असतात. अन्नपदार्थ व छोट्या उद्योगधंद्यांच्या सरकारी कारखान्यांच्या जोडीला या निर्मात्यांच्या सहकारी संस्था नित्योपयोगी माल तयार करीत असतात. १९५२ सालीं या सहकारी संस्थांमार्फत तयार झालेल्या मालाचें प्रमाण ४० टक्के फर्निचर, ३५ टक्के कपडे व पांघरुणें, ६५–७० टक्के भांडीं तयार करण्यांत आलीं.

सहकारी संस्थांच्या उत्पादनांत दरसाल वाढ होत असते. १९५१ सालीं त्यांनीं २२३० कोटी रुबलसचा माल व्यापारी संस्थांना पुरविला तर १९५२ सालीं २४२० कोटी रुबलसचा आणि १९५३ सालीं २६०० कोटी रुबलसचा माल पुरविला. हा सर्व माल विकण्याच्या बाबतींत या सहकारी संस्थांना कुठल्याहि प्रकारची अडचण उपस्थित झाली नाहीं.

निर्मात्यांच्या सहकारी संस्था आपल्या मालाची विक्री कशा प्रकारें करीत असतात?

प्रथम एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं सोविएत युनिअनमध्यें सर्व अर्थव्यवस्थेचा विकास एक समान राष्ट्रव्यापी योजनेनुसार होत असतो. निर्मात्यांच्या सहकारी संस्थांच्या उत्पादनाचाहि या राष्ट्रव्यापी योजनेंत विचार व समावेश करण्यांत आलेला असतो.

निर्मात्यांच्या सहकारी संस्थांमार्फत तयार होणाऱ्या मालापैकी बहुतेक माल हा सरकारी व्यापारी संस्थांमार्फत व खेड्यांतील ग्राहकांच्या सहकारी संस्थांमार्फत विकला जातो. या मालपुरवठ्याचें प्रमाण सहकारी संस्थांच्या मध्यवर्ती समितीमार्फत दरसाल व दर तिमाहीला ठरविलें जातें. या कामीं सोविएत व्यापार–खातें आणि ग्राहकांच्या संस्थांचें मध्यवर्ती मंडळ यांची संमति असावी लागते.

निर्मात्यांच्या सहकारी संस्थांचीं स्वतःचीं विक्री–भांडारेंहि असतात.

व्यापारी संस्थांना पुरवावयाच्या मालाखेरीज सरकारी कारखान्यांमार्फत मिळणाऱ्या ऑर्डरीप्रमाणें या सहकारी संस्था माल तयार करीत असतात. निरनिराळ्या संस्थांना लागणारें साहित्य, फर्निचर, वगैरे मालाच्या ऑर्डरी या सहकारी संस्थांना मिळत असतात. वैयक्तिक ग्राहकांमार्फत मिळणाऱ्या ऑर्डरीप्रमाणेंहि या सहकारी संस्था माल तयार करून देत असतात. ग्राहकांच्या आवडीनिवडीप्रमाणें हा माल तयार करून देण्यांत येत असतो, आणि क्वचित्कर्दा ग्राहकांना दिलेल्या सामुग्रीपासून त्यांना माल बनवावा लागतो.

निरनिराळ्या निर्मात्यांच्या सहकारी संस्था एकवटून ग्राहकांच्या सहकारी संस्थांशीं मालाच्या पुरवठ्यासंबंधीं करार करतात; त्या करारांत मालाचा दर्जा, प्रमाण, प्रकार आणि पुरवठ्यासाठी लागणारा वेळ या गोष्टी नमूद करण्यांत येतात. मालाची किंमत व ती चुकती करण्याची पद्धतहि या करारांत नोंदली जाते.

आपलें उत्पादन वाढविण्यासाठी आणि मालाच्या दर्जांत सुधारणा करण्यासाठी सहकारी संस्था सतत प्रयत्नांत असतात. उत्पादनांत वाढ झाल्यानें या सहकारी संस्थांच्या फायद्यांतहि वाढ होत असते.

हातानें जोडे शिवणाऱ्या चांभारांचे "एक्सपोर्टोबुव" नांवाचें सहकारी मंडळ कित्येक वर्षांमागें स्थापन करण्यांत आलें. सुरवातीच्या लहानशा यंत्रशाळेची आतां सुसज्ज मोठ्या कारखान्यांत वाढ झालेली आहे. या सहकारी संस्थेपाशीं आतां भरपूर रक्कम जमा झालेली आहे. या पैशाच्या साह्यानें संस्थेनें आपली नवीन तीन मजली इमारत उभारलेली आहे आणि बरीच यंत्रसामुग्री खरेदी केलेली आहे. या सहकारी संस्थेंत आज ७५० सभासद सामील झालेले असून त्या सहकारी संस्थेमार्फत २ कोटी, ९० लाख रुबल्स किंमतीचे चार लाख जोडे तयार करण्यांत येतात. इतर कोणत्याहि देशांना एखाद्या कारखान्याला इतका माल संपविण्यासाठीं बरेच परिश्रम करावे लागले असते, पण मॉस्कोच्या एक्सपोर्टोबुव सहकारी संस्थेला आपला माल विकण्याच्या कामीं कसलीहि अडचण पडत नाहीं. कारण, हा माल ठराविक ऑर्डरीप्रमाणें व आगावू कराराप्रमाणें तयार करण्यांत आलेला असतो. १९५३ सालीं या संस्थेला ३५,००,००० रुबल्स फायदा झाला. ही सहकारी संस्था आपला निम्मा माल मॉस्कोच्या विक्री–भांडारांना विकते. बराचसा माल ग्राहकांच्या सहकारी संस्थांच्या मध्यवर्ति मंडळामार्फत खरेदी केला जातो, आणि बाकीचा सहकारी विक्री–भांडारांना विकला जातो.

ग्राहकांच्या आवडीनिवडींशीं ज्यांचा नित्य संबंध येत असतो अशा विक्री–भांडारांच्या सूत्रधारांची, कलावंतांची व जोडे बनविण्यांत वाकबगार अशा कारागिरांची एक कला–समिति वरचेवर सहकारी संस्थांमार्फत तयार होणाऱ्या मालावर चर्चा करून निरनिराळ्या नवीन सूचना करते आणि नवीन नमुने सुचविते. या समितीच्या कार्यामुळें मालाच्या दर्जांत व प्रकारांत सतत सुधारणा होत जाते आणि त्या मालाला लागलेंच गिऱ्हाईक मिळतें.

## मुंबई राज्यांतील शेतकी कर्ज–पुरवठा

| | १९४६ | १९५१ | १९५३ |
|---|---|---|---|
| १ सोसायट्यांची संख्या (क्रेडिट व मल्टिपर्पज) | ४,७९६ | ९,४२९ | ९,९५३ |
| २ त्यांचे सभासद (लक्ष) | २·३२ | ६·९९ | ७·४८ |
| ३ वसूल भाग भांडवल (लक्ष रु.) | ५१·४४ | २२६·४४ | ३११·९५ |
| ४ रिझर्व्ह व इतर फंड (लक्ष रु.) | १११·९५ | २१६·०५ | २४९·६२ |
| ५ सभासदांच्या ठेवी (लक्ष रु.) | १०·५६ | १४१·१० | १२७·२७ |
| ६ खेळतें भांडवल (लक्ष रु.) | ३०६·८२ | १०६९·३५ | १३५९·६८ |
| ७ सभासदांकडून येणें शेतकी कर्ज (लक्ष रु) | २१·४३ | ७१९·९४ | ११०७·५१ |
| ८ प्रत्येक सभासदाकडील सरासरी येणें कर्ज (रु.) | ९१ | १२४ | १४८ |
| ९ सेंट्रल फिनॅन्सिंग संस्था | १३ | २५ | २४ |
| १० कचेऱ्यांची संख्या | १४० | २३१ | २५४ |
| ११ संलग्न सोसायट्या | ६,२७८ | १२,९५४ | १४,७६३ |
| १२ वसूल भांडवल (लक्ष रु.) | ५६·५४ | १४०·२३ | १६९·३५ |
| १३ रिझर्व्ह व इतर फंड (लक्ष रु.) | ६२·७० | १११·२६ | १४८·४७ |
| १४ ठेवी (लक्ष रु.) | ११७८·८५ | १९१९·४८ | २१२४·१८ |
| १५ सोसायट्यांकडून येणें कर्ज (लक्ष रु.) | ११६·९४ | ९५८·६९ | १०१९·३६ |
| १६ खेळतें भांडवल (लक्ष रु.) | १४०८·१३ | २५५२·८३ | २०६६·३७ |

## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

हेड ऑफिस - सरस्वती सदन, लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, जयसिंगपूर, मिरज

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | .... रु. | ५,०३,३०० |
| रिझर्व व इतर फंड | .... रु. | १,३९,८४१ |
| खेळतें भांडवल | .... रु. | ५० ९७,७१४ |

रु. १०/- फक्त बचत करणाऱ्या खातेदारासाठीं अभिनव योजना

| रु. | | मुदत | | परतीची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १० | — | १० वर्षें | — | १५—०-० |
| १० | — | ७ वर्षें | — | १३—८-० |
| १० | — | ५ वर्षें | — | १२—०-० |
| १० | — | ३ वर्षें | — | ११—०-० |
| १० | — | २ वर्षें | — | १०-१२-० |

दोन वर्षांपूर्वी केव्हांहि मागणी करितांच तावडतोब रक्कम बिनव्याजी परत.



स्थापना १९३५ + रजिस्टर नंबर ७२१८

## सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक, लि.

—कराड व सांगली—

## शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय !

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळे होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादी यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

हेड ऑफिस, कराड, ——— ब्रँच ऑफिस, सांगली

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ८२,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ११,५०,००० |
| बँकेनें वांटलेलें कर्ज | रु. | १५,४०,००० |

म. शि. पुटाणी, मॅनेजर. — नीलकंठ आणाप्पा कल्याणी, चेअरमन.



## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९३५ ) फोन नं. ५३

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें भांडवल | रु. | १,८८,२५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,८७,९७४ |
| ठेवी | रु. | २४,३२,८४३ |
| खेळतें भांडवल | रु. | ३८,७७,३९१ |

—: मुदत-ठेवीवरील व्याजाचे दर :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुदत १ वर्ष | द. सा. | द. शें. | रु. | ३ |
| मुदत ३ वर्षें | ,, ,, | ,, ,, | रु. | ४ |
| मुदत ५ वर्षें | ,, ,, | ,, ,, | रु. | ४। |

बँकेनें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली असून लॉकर्स भाड्यानें मिळतात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. इमारतीचे तळमजल्यास 'पे ऑफिस' उघडलें असून सरकारी नोकरी करीत असलेल्या ठेवीदारांचे सोयीकरितां व व्यापारी वर्गाचे सोयीकरितां पे ऑफिसची वेळ सकाळीं ९ ते ११ ठेवणेंत आली आहे.

ल. य. लागू, B. A., LL. B., मॅनेजर — म. ह. गोडबोले, B. A., LL. B., M. L. C., चेअरमन



## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल व रिझर्व | रु. | १२,७१,२०० |
| ठेवी ... ... | रु. | १,१८,३६,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,३८,९७,४०० |


—: शाखा :—

दादर, माहीम, बेळगांव, पुणें.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

पद्धतशीर बचत हीच राष्ट्रसेवा

## भारत इंडस्ट्रियल बँक लि., पुणें



श्री. के. पां. जोशी
(नवे चेअरमन)



श्री. बी. बी. वाळवेकर
(माजी चेअरमन)

### श्री. वाळवेकर ह्यांचे भाषण

भारत इं. बँकेची वार्षिक सभा नुकतीच झाली. त्यावेळीं भाषण करतांना अध्यक्ष, श्री. वाळवेकर, ह्यांनीं ठेवी, कर्जें, गुंतवणूक, इत्यादींचे तुलनात्मक आंकडे सांगितलें. त्यावरून असें दिसतें कीं, अहवालाचे वर्षी बँकेकडील ठेवींत ८,३१,००० रु. ची भर पडली. तारणावरील व पतीवरील मिळून कर्जाची रक्कम मात्र ७६,९१७ रु. नींच वाढली. डायरेक्टरांनीं कर्जे ज्यास्त कसोशीच्या मर्यादेंत दिलीं. बँकेचें धोरण विशेषतः तारणावर कर्जें देण्याचेंच आहे. बँकेकडील कर्जरोख्यांची ताळेबंदांतील किंमत २२,०७,९३४ रु. असून त्यांची दर्शनी किंमत २१,९२,३०० रु. आहे. ऑडिटरांचे सल्ल्यानुसार बुडींत व संशयित कर्जाकरितां ११,००० रु. ची तरतूद केल्यावरहि २३,४८३ रु. नफा राहिला आहे. बँकेची कचेरी कार्तिक शु १ दि. ७-११-१९५३ दिवशीं स्वतःच्या नव्या इमारतींत नेली. लिफ्टसह इमारतीची किंमत सुमारें ३,६८,५४५ रु. होईल. बँकेस भरपूर व सोइस्कर जागा मिळूनहि भाड्यानें दिलेल्या जागेचें मासिक ८०० रु. भाडें येत आहे. सेफ डिपॉझिट लोकर्सला मागणी वाढत आहे.

पुढील वर्षासाठी श्री. के. पां. जोशी, वकील, ह्यांची अध्यक्ष व श्री. हरीभाऊ बळवंत गिरमे ह्यांची उपाध्यक्ष म्हणून डायरेक्टर बोर्डानें निवडणूक केली आहे.

### ग्राहकांस सूचना

"अर्था"चा ह्यापुढील अंक दि. ५ मे रोजीं प्रसिद्ध होईल.

दि. २८ एप्रिलचा अंक सहकार विशेषांकानिमित्त बंद राहील.

### बाँबे को. क्वार्टर्ली सुवर्णमहोत्सव विशेषांक

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटच्या दि बाँबे को. ऑपरेटिव्ह क्वार्टर्लीचा एप्रिल, १९५४ चा अंक सुवर्णमहोत्सव विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रारंभीं सहकारी पुढाऱ्यांचे संदेश देण्यांत आले असून त्यानंतर सर आर. बी. यु. बँक आय. सी. एस. (रि.), श्री. व्ही. एस. भिडे, आय. सी. एस. (रि.), दिवाणबहादुर सी. एम्. गांधी, रावसाहेब गिरधारीलाल डी. मेहता, श्री. डाह्याभाई ए. पटेल, श्री. रमणिकराय एन. मेहता, श्री. जी. आर. नलवडी, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. बी. पी. पटेल, आय. सी. एस., ह्यांचे चळवळीविषयक अनुभव सांगणारे व मार्गदर्शन करणारे लेख देण्यांत आले आहेत. शेवटीं मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीची जिल्हावार आणि आंकडेवार माहिती नकाशांच्या साहाय्यानें चित्रित करण्यांत आली आहे. मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीचा वेगवेगळ्या अधिकारी व्यक्तींच्या दृष्टिकोनांतून एकत्रित आढावा घेणारा हा विशेषांक सहकारी क्षेत्रांतील अभ्यासूंना उपयुक्त वाटेल.

### सारस्वत को. बँकेचा राष्ट्रविकास बचत-योजनेस हातभार

#### कर्जरोखे घेणारांसाठी सवलतीची कर्जयोजना

जनतेच्या बचतीच्या संवर्धास प्रोत्साहन मिळावें आणि राष्ट्राच्या विकास–प्रयत्नांत मदत व्हावी, या दृष्टीनें भारत सरकारचें ३½% नॅशनल प्लॅन लोन १९६४ हें कर्ज विकत घेऊं इच्छिणारांसाठी सारस्वत को. बँकेनें खालील सवलती देण्याचें ठरविलें आहे.—

(१) बँक जें कर्ज देईल, तें २५ मासिक हप्त्यांनीं फेडण्याचें आहे. पहिला हप्ता कर्जाच्या अर्जाबरोबरच यावयाचा आहे. (२) येणें कर्जावर ३% दरानें व्याज आकारलें जाईल व तें दर सहा महिन्यांनीं (३० जून व ३१ डिसेंबर) बँकेस यावयाचें. (३) बँकेमार्फत खरीदलेले ३½% १९६४ चे कर्जरोखे कर्जास तारण रहातील. कर्जदाराचे वतीनें हे रोखे बँकेकडे रहातील आणि त्यावरील व्याज ठराविक वेळीं कर्जदाराचे खात्यांत जमा केलें जाईल. (४) एखादा कर्जाचा हप्ता थकला, तर बँक कर्जावरील व्याजाचा दर वाढवूं शकेल (५) कर्जदार त्याच्या इच्छेप्रमाणें केव्हांहि कर्जफेड संपूर्णपणें करूं शकेल.


# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(स्थापना : १९१८)

मुख्य ऑफिस : सारस्वत बँक गृह, गिरगांव

शाखा : दादर, माहीम, बेळगांव, पुणें.

## राष्ट्र विकास बचत योजना

भारताच्या विकासाला मदत करण्यासाठी ३॥ टक्के सरकारी नवीन कर्ज घेऊं इच्छिणाऱ्यांना बँक, ३ टक्के सवलतीच्या दरानें कर्ज देईल.

विशेष माहितीसाठी लिहा. शाखा : सारस्वत कॉलनी, पुणें.

रौप्यमहोत्सव ] १९५४ वर्ष [ मूल्यमापन

# कॉमनवेल्थ

## विमा कंपनी लि. पुणें

★ आयुर्विमा ★ आग ★ मोटार-अपघात ★ वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन इ.

सर्व प्रकारच्या विमा कामांत विश्वासपूर्वक व निश्चितपणें प्रगति करीत आहे.

★

वजनदार व उत्साही इसमांना सढळ अटीवर कंपनीची एजन्सी मिळेल.

★

श्री. म. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

म्यूच्युअल विमापद्धति
म्हणजे
सहकारी तत्त्वाचेंच परिणत स्वरूप !!!

कारण, शेअरभांडवल न गुंतविनां देखील केवळ विमा उतरल्यानें विमेदार म्यूच्युअल कंपनीचा सभासद–हक्कदार व नफ्याचा भागीदार होतो.

## दि मोटार ओनर्स म्यूच्युअल इन्शुअरन्स कं. लि.

हीच मोटारविम्याची अग्रगण्य
म्यूच्युअल कं. होय

माफक दर, हप्त्याची सोय, अनेक सवलती, तत्पर व योग्य क्लेम देण्याची पद्धत, मजबूत आर्थिक पाया, चोख व काटकसरीची व्यवस्था

—शिवाय—

ॲक्ट, थर्ड पार्टी, कॉम्प्रिहेन्सिव्ह वगैरे सर्व प्रकारचे मोटारविमे स्वीकारले जातात.

लौकरच आयुर्विमा क्षेत्रांत पदार्पण करणार !!

— अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा. —

मुख्य कचेरीः—फोर्ट रोड, बेळगांव
शाखाः—मुंबई, पुणें, नासिक, कोल्हापूर
ऑर्ग. कचेऱ्या—दिल्ली, कलकत्ता, कर्नूल आणि मद्रास प्रदेश

WILICO

मूळचे माफक हप्ते आणखी कमी केले

विमेदारांना सर्वाधिक फायदा देण्याच्या कंपनीच्या धोरणानुसार कंपनीनें विमा-हप्त्याचे दर १ एप्रिल १९५४ पासून आणखी कमी केले आहेत.

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लिमिटेड

—सातारा—

पुणें शाखा :—वेस्टर्न इंडिया हौस,
लक्ष्मी रस्ता, पुणें नं. २.

## धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड

मुख्य कचेरी—१५१४ मारुती गल्ली, बेळगांव
( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयींवर अधिष्ठित असलेली*

★

बेळगांव, धारवाड, कारवार आणि विजापूर या जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं बँकेच्या शाखा असून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी मुंबई कर्नाटकांतील एकमेव बँक.

★

मुंबई व इतर ठिकाणांहून रेल्वे रिसिटस वसुली-साठी पाठविण्याची सोय आहे.

★

जी. डी. सराफ
चेअरमन

## दि फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज*

ग्रेट ब्रिटनमधील कारखानदारांची ही संघटना असून, "सर्व तऱ्हेच्या ब्रिटिश उद्योगांना प्रोत्साहन देणें व त्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करणें" हा तिचा हेतु आहे. कारखानदार आणि कामगार ह्यांचे मधील परस्पर–संबंधांसाठी ब्रिटिश एम्प्लॉयर्स फेडरेशन ही संस्था आहे; बाकी सर्व औद्योगिक प्रश्नांमध्यें दि फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज लक्ष घालते. तिच्या पटावर ६,६०० सभासद आहेत, प्रत्येकी १,००,००० पेक्षा अधिक कामगार असणारे कांहीं कारखाने आहेत, त्याचप्रमाणें १०० कामगारांपेक्षा कमी कामगार असणारे "लहान" (?) कारखानेहि आहेत. फेडरेशनशीं २९० व्यापारी संस्था संलग्न आहेत, म्हणजे त्यांचे हजारों सभासदांचाहि फेडरेशनशीं अप्रत्यक्ष संबंध पोंचतो.

धोरणाच्या सर्व प्रश्नांवर "ग्रँड कौंसिल" निर्णय घेते. ह्या कौंसिलची निवडणूक प्रत्येक तीन वर्षांनीं होते व त्या कौंसिलचे ४०० सभासद असतात. त्यांपैकीं दोनतृतीयांश व्यापारी संस्थांनीं नियुक्त केलेले असतात आणि बाकीच्या एक तृतीयांशांची वैयक्तिक फर्म्स व कंपन्या निवडणूक करतात. ग्रँड कौंसिलची बैठक महिन्यांतून एकदां भरते; अध्यक्षाची निवडणूक दरसाल होते परंतु दोन वर्षें तो अध्यक्ष रहातो असा संकेत आहे. ग्रँड कौंसिल वेगवेगळ्या प्रश्नांसाठी समित्या नेमते. त्याखेरीज १९ स्टँडिंग कमिट्या असतात. कचेरीचें काम डायरेक्टर जनरल करतो; त्याच्या हाताखालीं १६० नोकर आहेत.

उद्योगधंद्यांविषयीं सर्वसाधारण धोरण आखून तें जाहीर करणें, हें फेडरेशनचें महत्त्वाचें काम आहे. उद्योगधंद्यांचे प्रतिनिधि ह्या नात्यानें फेडरेशन सरकारशीं प्रत्यक्ष वाटाघाटी व बोलणीं करते. सरकारी व निमसरकारी संघटनांवर फेडरेशनचे प्रतिनिधि असतात. "नॅशनल प्रॉडक्शन अडव्हायसरी कौंसिल ऑन इंडस्ट्रीज"च्या बैठकी तर अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालींच भरतात. परराष्ट्रीय क्षेत्रांतहि फेडरेशन ब्रिटिश हितसंबंधांचें संरक्षण करतें. सभासदांना फेडरेशनचा सर्व प्रकारचा तपशीलवार सल्ला नेहमींच उपलब्ध असतो सभासदांकडून दरमहा २,००० बाबतींत फेडरेशनचा तज्ज्ञ सल्ला घेतला जातो. फेडरेशनचे सध्यांचे अध्यक्ष सर हॅरी पिलकिंगटन हे असून, सर नॉर्मन व्ही. किपिंग हे डायरेक्टर जनरल आहेत.

* एफ. बी. आय. रजिस्टर ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज, १९५४. २४ वी आवृत्ति, पृ. सं. ९५२


दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.
हेड ऑफिस–पुणें २

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| गंगाजळी | रु. | ७,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,००० चे वर |

★ बँकेच्या सर्व शाखांवर व कलकत्ता, मद्रास वगैरे शहरांवर सवलतीच्या दरानें ड्राफ्टस् दिले जातात.

★ मुंबई शाखेमार्फत लेटर ऑफ क्रेडिटची व्यवस्था केली जाते.

★ महाराष्ट्र एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी कं. ही व्यवस्थापत्र, विश्वस्तपत्र वगैरेंचीं कामें करते.

★ बँकेच्या इमारतींतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्चा अवश्य फायदा घ्यावा.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.



# कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाउलवाटा )
लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
पृ. सं. १६८ ★ किं. अडीच रु.
गुजराती आवृत्ति तयार होत आहे
भाषांतरकार :
प्रोफेसर शशिन ओझा, भावनगर



# दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
वाई ( उ. सातारा )

| | |
|---|---|
| ठेवी ... ... | रु. ३,०७,२१० |
| खेळतें भांडवल ... | रु. ४,६०,००० |

ठेवीचे दर ½ टक्का ते ४ टक्के

वाई शहरांतील लहान व्यापारी, मध्यम व गरीब वर्गीयांची गेलीं ३३ वर्षे सेवा करणारी संस्था

गृहबचत योजना, सभासद तरतूद निधि, वगैरे योजना सुरू करणारी

एकमेव संस्था

अत्यंत माफक दरानें कर्जाऊ रक्कम दिली जाते
व
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

रा. चिं. पावगी
चिटणीस.

## दि रत्नाकर बँक लिमिटेड कोल्हापूर

### श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., चेअरमन, यांचें १० व्या वार्षिक सभेच्या वेळचें भाषण

१९५३ सालामध्यें दक्षिण महाराष्ट्रांत व विशेषत: कोल्हापूर, सांगली विभागांत ज्या मालाचें उत्पादन होतें त्या सर्वांचे म्हणजे गूळ, शेंग, तेल, हळद, तंबाकू वगैरे पदार्थांचे भाव चांगले टिकून राहिले; इतकेंच नव्हे तर गेल्या मार्च, एप्रिल महिन्यांत ज्यांनीं ज्यांनीं मालाची ठेवणी केली त्या सर्वांना तेजीचा फायदा बऱ्या प्रमाणांत मिळाला. तद्नंतर गेल्या वर्षी कोल्हापूर विभागांत वर्षाकाळ जरी थोडा अधिक झाला तरी एकंदरीनें गेल्या दोनचार वर्षांपेक्षा पाऊसपाण्याची परिस्थिति सगळीकडे चांगली राहिली व त्यामुळें ज्वारी, तांदूळ, गहूं यांसारख्या अन्नधान्याच्या उत्पादनामध्यें वाढ झाली. ही वाढ सर्व देशभर झाल्यामुळें त्याचें प्रत्यंतर अन्नधान्यावरील नियंत्रणें नाहींशीं होण्यांत झालें आहे. जवळ जवळ १० वर्षांच्या कालावधीनंतर हीं नियंत्रणें नाहींशीं झाल्यामुळें जनतेस आनंद वाटला असून त्यांच्यांत समाधानी वृत्ति दिसत आहे. कापड, साखर, रेल्वे वॅगन्स, सिमेंट, लाकूड, लोखंड यांचाहि पुरवठा चांगला वाढल्यामुळें एकप्रकारचें नेहमींचें जीवन सुरू झाल्यासारखें वाटतें. अर्थात् सर्वच बाजूंनीं नेहमीं समाधान असणें अलीकडच्या काळांत जवळजवळ अशक्यच झालें आहे. जसजसे वस्तूंचे पुरवठे नियमित प्रमाणांत व विश्वसनीयरीत्या होऊं लागले तसतसा जनतेंत विश्वास निर्माण होऊन सांठे करण्याची प्रवृत्ति नाहींशीं झाली. त्यामुळें मालाचा खप पूर्वींइतका भरमसाट राहिला नाहीं. वस्तू आतां मिळते तेव्हां जरूर तेवढेच घेऊंया, अशी परिस्थिति निर्माण झाली व त्यामुळें एकंदर वस्तूंचे खप कमी होऊन व्यापाऱ्यांचे नफे ढासळूं लागले. वाढलेले खर्च त्यांना एकदम आटोक्यांत आणणें शक्य झालें नाहीं. निरनिराळ्या संस्था किंवा व्यक्तींच्याकडून काढलेल्या कर्जांची भरणा करण्याची फेरी चुकूं लागली. त्यांचें इतरांचेकडील येणें वेळेवर येईनासें झालें. निराळ्या पद्धतीच्या सेल्सटॅक्समुळें व्यापारास लागणाऱ्या मोठ्या रकमा एकदम क्रेडिटवर मिळेनाशा झाल्या; व वर्षाच्या अखेरपर्यंत निरनिराळ्या प्रकारच्या व्यापाऱ्यांची परिस्थिति बिघडली व या परिस्थितीचा परिणाम व्यापाराशीं संबंध असणाऱ्या व्यक्ती व संस्था यांचेवर दिसूं लागला. अशाच वेळीं हिंदुस्थानांतील कांहीं बँकांना रिझर्व बँकेनें लायसेन्स देणेचें नाकारल्यामुळें त्यांना आपले दरवाजे बंद करावे लागले. पैसे अडकलेल्या ठेवीदारांची परिस्थिति शोचनीय झाली व हळूंहळूं सर्वांचेवरच या घटनांचा परिणाम दिसून येऊं लागला.

१९५३ सालची सुरवात जितकी आशादायक होती, तितकीच अखेर आशादायक राहिली नाहीं. बरेच दिवसांपासून मंदी येणार असें आर्थिक तज्ज्ञांचें मत होतें, तें हळूंहळूं खरें दिसूं लागलें आहे. बेकारी, करांचा भार, वाढलेला खर्च, घटलेले नफे, कर्जाचे चुकलेले हप्ते अशा परिस्थितींत व्यापारी व मध्यमवर्गीय जनता सांपडलेली दिसते. अशा एकंदर परिस्थितींत आपल्या बँकेकडील गेल्या चार वर्षांत मुदत ठेवी अंदाजे ६ लाखांनीं वाढल्या आहेत. सेव्हिंग्ज ठेवी अंदाजें १ लाखांनीं वाढल्या आहेत. एकुण ठेवींत भर १९५० सालापासून अंदाजें ७½ लाखांची असून ही वाढ १९५० सालीं बँकेच्या ज्या ठेवी होत्या त्यांच्या ½ पेक्षा अधिक आहे.

१९५३ सालअखेर जीं एकूण कर्जें आहेत त्यांपैकीं १५ लक्ष ३ हजार तारणावर आहेत; व ६ लक्ष २२ हजार बिनतारणाचीं आहेत. म्हणजे बिनतारण कर्जें एकूण कर्जाच्या ⅓ पेक्षाहि कमी आहेत; व तारण कर्जांपैकीं मालगहाण व सोनेंचांदी गहाणाचें प्रमाण शेंकडा ६३ आहे. घरगहाणावरील व्यापारी स्वरूपाचीं कर्जें शेंकडा २७ टक्के आहेत; व इतर तारणकर्जें १० टक्के आहेत. तारण व बिनतारण कर्जांचें जें प्रमाण आहे तें आम्हांस रिझर्व बँकेनें ज्या सूचना दिल्या आहेत त्या प्रमाणांत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या १० वर्षांत अद्याप कोणत्याहि खातेदाराचें कर्ज संपूर्ण बुडित म्हणून घालणेचा प्रसंग बँकेवर आलेला नाहीं. आतांपर्यंत वेळेवर भरणा न झालेल्या खात्यांतील वसुलीचें प्रमाण लक्षांत घेतां संशयित कर्जांकरितां केलेली तरतूद आम्हांस योग्य वाटते.

ठेवी वाढल्या, कर्जें वाढलीं, ग्रॉस उत्पन्न वाढलें परंतु निव्वळ नफा कां वाढला नाहीं, त्याचें कारण इं. रिलेशन्स ॲक्टमुळें व बँक नोकर संघाच्या कायदेशीर मागण्यामुळें स्टाफ पगारावरील खर्चांत गेल्या पांच वर्षांत पंचवीस हजारांची भर पडलेली आहे.

बँकेचें कामकाज हें तिच्याजवळ असणाऱ्या दररोजच्या शक्तीवरच अवलंबून आहे व गेल्या दोन–चार वर्षांतील ठेवींचे जे आकडे आपणापुढें ठेविलेले आहेत त्यावरून बँकेची शक्ति दररोज वाढत आहे यांत कसलीच शंका नाहीं. परिश्रमानें आपण जोपासना केलेलें हें झाड अधिक मोठें व विशाल झाल्यास त्याची छाया व फळें आपणां सर्वांना मिळणार आहेत व तो काळ फार दूरचा नाहीं, असें मला वाटतें. आपणां सर्वांचें आतांपर्यंत जसें थोर सहकार्य लाभलें तसेंच पुढेंहि लाभेल अशी आशा आहे.


सांडू ब्राह्मी तेल..




जागरण व मानसिक श्रम - करणारांस अत्यंत उपयोगी

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबर लि., चेंबूर ( मुंबई )

ब्राह्मी तेलाचे कल्पक व संशोधक

पुणें चीफ एजंटस् : प्रभाकर एजन्सी, १०० रविवार, रविवार पोस्ट ऑफिससमोर, पुणें २.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

॥ श्री ॥

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २

"All Is Well That Ends Well"

उसापासून साखर करण्याकरितां सरकार सिंडिकेटच्या उसाला पाणी देतें तेव्हां सिंडिकेटनें फक्त साखर करावी, मशिनरी २५० टनांची लहान या सबबीवर "सिंडिकेटनें उसापासून गूळ करूं नये" असा सरकारी हुकूम १९४३ सालीं सिंडिकेटवर बजावण्यांत आला.

★ गूळबंदीच्या हुकुमाचा आज झालेला कायमचा फायदा ★

एक हजार टनांची नवीन मशिनरी चालू होऊन साखरेचें उत्पादन पूर्वी पन्नास हजार पोतीं होत होतें तें आतां कायमचें एक लक्ष पोत्यांपर्यंत वाढलें आहे. नवीन मशिनरीकरितां घेतलेल्या ( ७० ) लक्ष रुपयांच्या ठेवींपैकीं (५१) एकावन्न लक्ष रुपयांच्या ठेवी साखरविक्रींतून व्याजासह परत केल्या आहेत.

सिंडिकेटच्या ठेवीदारांना धन्यवाद

सत्तर लक्ष रुपये किमतीच्या नवीन मशिनरीवर बँका, फायनान्स कॉर्पोरेशन वगैरे कोणाचाहि बोजा नाहीं. नवीन मशिनरीच्या ठेवींना तारण आहे.

पुढील हंगामांत साखरेच्या जोडीला "स्पिरिटचें" उत्पादन सुरू होईल.
ही उत्पादन-जोडी व्याजासह ठेवी परत करील.
ठेवींची मुदत वाढवून मिळत आहे; नवीन ठेवी येत आहेत.

ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत पांच वर्षें — व्याज ७॥ ( साडेसात ) टक्के.
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ ( सात ) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ ( सहा ) टक्के.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ पुणें २.
दि. ३१-३-१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंटस्.

# विविध माहिती

**भारतीय शिल्पाच्या फोटोंचें प्रदर्शन**—रिओ-डि-जानेरिओ ह्या शहरांत भारतीय शिल्पकलेच्या फोटोंचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. रेमंड बर्निअर नांवाचा एक स्विस फोटोग्राफर भारतांत आला होता. त्यावेळीं त्यानें हे फोटो संग्रहित केले होते. त्यांपैकीं निवडक १०० फोटो प्रदर्शनांत मांडण्यांत आले आहेत.

**कैरोमधील प्रदर्शन**—गेल्या १४ तारखेपासून कैरो येथें भारतीय मालाचें एक प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत २०० व्यापाऱ्यांनीं व उद्योगपतींनीं आपला माल मांडला आहे. प्रदर्शन तीन आठवडे चालणार असून इजिप्शिअन ग्राहकवर्ग त्याचें चांगलें स्वागत करील, अशी अपेक्षा आहे.

**सुरतमधील छोटी बचत**—मार्च, १९५४ अखेर संपलेल्या वर्षांत सुरत जिल्हा आणि शहर ह्या भागांतून छोट्या बचतीच्या पद्धतीनें ८४,०७,७८८ रुपये जमविण्यांत आले. त्याच्या मागील वर्षी ६६ लाख रुपये जमविण्यांत आले होते. ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकेट्समध्यें ५,३१,५०० रुपये गुंतविण्यांत आले. मागील वर्षी ह्या पद्धतीनें ७ लाख रुपयांची बचत करण्यांत आली होती.

**नागपूरमधील उद्योगपतीचा दौरा**—नागपूरमधील ग्रामोद्योगांशीं संबंध असलेले उद्योगपति श्री. कृष्णराव हे लवकरच ब्रिटन, अमेरिका आणि युरोपच्या दौऱ्यावर जाणार आहेत. आपल्या कारखान्यांत तयार झालेल्या कांहीं वस्तू ते राणी एलिझाबेथ आणि प्रे. आयसेन होवर ह्यांना नजर करणार आहेत. दोन वर्षांपूर्वी ते जपानलाहि जाऊन आले आहेत.

**१२,५०० पौंड किंमतीचें चहाचें सामान**—लंडनमधील एका प्रसिद्ध लिलांववाल्यानें १२,५०० पौंड किंमत असलेला एक चांदीचा चहाचा सेट नुकताच विकला. ह्या सेटमध्यें चांदीचीं पांच भांडीं आहेत आणि भांड्यांवर पांचवे जॉर्ज ह्यांच्या निशाण्या कोरलेल्या आहेत. चहाच्या सेटची ही किंमत सगळ्यांत अधिक आहे असें समजतें.

**भारतांत कॅमेऱ्यांचा कारखाना**—भारतामधील एक कारखानदार प. जर्मनीमधील एका कारखान्याच्या साह्यानें कॅमेरा तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे, असें समजतें. कारखान्यांत सर्व प्रकारचे कॅमेरे तयार करण्यांत येणार आहेत. ह्याबाबत सध्यां वाटाघाटी चालू असल्यानें संबंधित लोकांचीं नांवें गुप्त ठेवण्यांत आलीं आहेत.

**जगांतील सर्वांत जुनें पुस्तक**—जगांतील सर्वांत प्राचीन छापील पुस्तकाच्या तीनच प्रती शिल्लक असून त्यांपैकीं एक प्रत न्यूयॉर्क येथील पिअरपॉंट मॉर्गन लायब्ररीनें २६,००० पौंडाला विकत घेतली आहे. ह्या पुस्तकाचें नांव 'कॉन्स्टन्स मिसल' असें असून तें ५०० वर्षांपूर्वी छापलें गेलें आहे, असें म्हणतात. छापखान्याचा संशोधक गटेनबर्ग ह्यानें छापलेलें तें पहिलेंच पुस्तक आहे, असें कांहीं तज्ज्ञ म्हणतात.

**भारतामधील पहिला विमानमार्ग**—१९३२ सालीं भारतांत पहिल्यानेंच विमानांची वाहतूक सुरू करण्यांत आली. पहिला वैमानिक प्रवास टाटा विमान कंपनीनें १५ ऑक्टोबर, १९३२ रोजीं केला. प्रवासाचा मार्ग कराची-मुंबई-मद्रास असा होता.

**गोवा रेडिओवरील भारतीय जाहिराती**—सिलोन रेडिओ व गोवा रेडिओ ह्यावरून भारतामधील कांहीं कंपन्या आपल्या जाहिराती देत असतात. ह्या जाहिराती बंद करण्यास लावण्याचा विचार भारताचें अर्थखातें करीत आहे, असें समजतें. पोर्तुगाल आणि फ्रान्स ह्यांच्या भारतामधील वसाहतींबाबत राजकीय वावटळ उठल्याचा हा परिणाम आहे.

**विलंबानें गिऱ्हाइक तुटेल !**—ब्रिटिश सरकारच्या दिरंगाईच्या धोरणामुळें रशिआकडून आलेली कोट्यावधि पौंड किंमतीच्या मालाची मागणी रद्द होण्याचा संभव आहे, असा इषारा ब्रिटिश पार्लमेंटच्या एका सभासदानें दिला आहे. अमेरिकेमधील मंदी अशीच वाढत गेल्यास रशिआच्या वरील मागण्यामुळें ब्रिटनमधील बेकारीचा प्रश्न सुटण्यास पुष्कळ मदत होईल असें त्यांचें मत आहे.

**अमृतसरचें रेडिओ स्टेशन**—पुढील महिन्यांत जालंदर येथें ५० किलोवॅट शक्तीचें रेडिओ स्टेशन सुरू करण्यांत येत असल्यामुळें अमृतसर येथील केंद्र बंद करण्यांत येणार आहे असें समजतें. जालंदर आणि अमृतसर जवळ जवळच आहेत. अमृतसर येथील नोकरवर्ग इतर केंद्रांत सामावला जाणार आहे. जालंदर येथील रेडिओचे कार्यक्रम पाकिस्तानांतहि ऐकूं जातील.

**रेल्वे वहातुकीचा तपशील**—भारतीय रेल्वेजनीं १९४८-४९ सालीं दर गाडींत सरासरी ४१४ प्रवासी नेले. १९५०-५१ सालीं ४०४ प्रवासी नेले आणि १९५२-५३ सालीं ३३० प्रवासी नेले. रेल्वेगाड्यांतील गर्दी कमी करण्यांत अशा रीतीनें मार्च १९५३ अखेर २० टक्के सुधारणा झाली.


## जनता सहकारी बँक, लिमिटेड

फोन २८८५ ] ८६६ सदाशिव पेठ, फुले मार्केट रस्ता, पुणें २

**अल्पावधींत जनतेच्या विश्वासाचें ठिकाण**

★ प्रमुख शहरीं हुंड्या व बिल्स कलेक्शनची योजना
★ अल्प मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याजाचे दर
★ नाममात्र सभासदत्वाची योजना
★ काटकसरीसाठी बचत योजना
★ कार्यक्षम व्यवस्थापकांची देखरेख

बँकिंगच्या सर्व व्यवहारासाठी भेटा.

द. शं. जमदग्नि
मॅ. डायरेक्टर

रौप्यमहोत्सवोन्मुख

## कोरेगांव को-ऑपरेटिव्ह पीपल्स बँक, लि. कोरेगांव

( ४-१२-१९२९ )

| | | |
|---|---|---|
| ( १ ) अधिकृत भाग भांडवल | ... | रु. ८०,००० |
| ( २ ) भरलेलें भाग भांडवल | ... | रु. ६३,६०० |
| ( ३ ) रिझर्व्ह आणि इतर फंडस | ... | रु. ४०,१०० |
| ( ४ ) ठेवी ... | ... | रु. २,६४,७०० |
| ( ५ ) खेळतें भांडवल ... | ... | रु. ४,४५,००० |

रौप्यमहोत्सवानिमित्त आकर्षक दरानें ठेवी घेण्यास सुरुवात केली आहे

जी. आर्. कुलकर्णी, चेअरमन
गजानन अनंत भंडारे, प्रेसिडेंट

शंकर रामचंद्र वकील, मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.